


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

रविवार, दि. २८ डिसेंबर २०२५




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०४३ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com | Gmail : punegavkari@gmail.com

# मुंबईत भाजप, शिंदेसेनेचे २०७ जागांवर एकमत

## २० जागांचा तिढा ; ठाण्यात १२ जागांवरून अडले घोडे; आज तोडगा शक्य

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

मुंबई महापालिकेच्या २२७ पैकी २०७ जागांवर भाजप व शिंदेसेनेचे एकमत झाले आहे. भाजप १२८ तर शिंदेसेना ७९ असे जागावाटप झाले असून तिढा असलेल्या २० जागांसाठी महायुतीच्या समन्वय समितीची शनिवारी वांद्रेच्या रंगशारदा हॉटेलमध्ये बैठक झाली. या बैठकीत जागावाटप, उमेदवारांची अदलाबदल आणि प्रचाराच्या रणनीतीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विधानसभेप्रमाणे १० ते १५ जागांवर उमेदवारांची देवाणघेवाण करून भाजप उमेदवारांना शिंदेसेनेतून उमेदवारी देण्याची शक्यता आहे. भाजपने १०० हून अधिक जागा जिंकण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. मात्र, उद्धवसेना व मनसेचे आव्हान असल्याने भाजपचा प्रस्ताव स्वीकारून जागा पदरात पाडणे व युतीतच निवडणूक लढणे हेच पर्याय शिंदेसेनेसमोर आहेत.

मुंबईसाठी वंचित बहुजन आघाडी व कॉंग्रेसमध्ये सकारात्मक चर्चा सुरू असली तरी दोन जागांवर मतभेद आहेत. त्यामुळे चर्चा खोळंबली आहे. वंचितकडून कॉंग्रेसला २० व ५० अशा दोन याद्या देण्यात आल्या होत्या. त्यापैकी २० जागा कोणतीही तडजोड होणार नाही अशा, तर ५० जागा चर्चा होऊ शकते अशा होत्या. २० पैकी १८ वर एकमत झाले, पण २ जागांवरून अडले.

छ. संभाजीनगरमध्ये युतीची बैठक गुंडाळली : छत्रपती संभाजीनगर मनपात प्रत्येकी ४५ जागा लढविण्याच्या मुद्द्यावर भाजप-शिंदेसेनेची शनिवारी पाच तास बैठक झाली. अंतिम निर्णय होऊ शकला नाही.

ठाण्यात शनिवारी तीन तास महायुतीची तिसरी महत्त्वाची बैठक पार पडली. मात्र, तीन ते चार प्रभागांवरून म्हणजेच १२ जागांवरून शिंदेसेना आणि भाजपमध्ये मतभेद कायम आहेत.

नवी मुंबईत भाजपने शिंदेसेनेला २० जागा सोडण्याची तयारी दर्शवली होती. तथापि, ते शिंदेसेनेला मान्य नसल्याने युती रखडली आहे. दोन्ही पवारांची चर्चा सुरू आहे. पुणे महापालिका निवडणुकीत अजित पवार आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी एकत्र येणार असे चित्र असतानाच राष्ट्रवादी (शरद पवार) चे नेते अंकुश काकडे यांनी हे दोन पक्ष एकत्र येणार नाहीत असे स्पष्ट केले.

ते म्हणाले की, आम्ही आमच्या चिन्हावर लढू, तुम्ही तुमच्या चिन्हावर लढा असे आम्ही त्यांना सांगायला गेलो होतो; पण त्यांना ते मान्य नव्हते. आपण महाविकास आघाडीसोबतच (कॉंग्रेस, उद्धवसेना) लढले पाहिजे असा सुप्रिया सुळे यांचा आग्रह आहे, त्यानुसार चर्चा सुरू आहे.

सूत्रांनी सांगितले की, घड्याळावरच दोन्ही पक्षांनी लढावे असा अजित पवारांच्या नेत्यांनी दिलेला प्रस्ताव शरद पवार यांच्या पक्षाने फेटाळल्याने आघाडी होऊ शकली नाही.



आमच्या संयुक्त बैठकीत प्रचाराचे मुद्दे, नेत्यांच्या सभा, जागावाटपाची चर्चा झाली. समोर येणारा उमेदवार कोण व कोणत्या पक्षाचा आहे. तेथील पक्षीय समीकरणे व स्थानिक परिस्थिती पाहून अंतिम निर्णय घेतला जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात चर्चा होऊन लवकरच तोडगा निघेल.

**- आ. अमित साटम, अध्यक्ष, मुंबई भाजप**

ज्या जागांवर मतभेद आहेत त्याबाबत सविस्तर चर्चा झाली. समन्वय समितीची आणखी एक बैठक होणार असून त्यात निर्णय न झाल्यास मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची चर्चा होऊन तेच योग्य तोडगा काढतील. येत्या दोन दिवसात उमेदवारांची घोषणा होऊ शकते.

**- राहुल शेवाळे, नेते, शिंदेसेना**




## नैसर्गिक संकटांमुळे अब्जावधींचे नुकसान

**नवी दिल्ली: (समर्थ गांवकरी)**


जगभरात २०२५मध्ये आलेल्या उष्णतेच्या लाटा, जंगलांना लागलेले वणवे, दुष्काळ आणि वादळे यामुळे १२० अब्ज डॉलरपेक्षा अधिक नुकसान झाल्याचा निष्कर्ष एका अभ्यासात काढण्यात आला आहे. ब्रिटनस्थित 'ख्रिश्चन एड' या स्वयंसेवी संस्थेने प्रसिद्ध केलेल्या या अभ्यास अहवालात, मानवाला हवामान बदलाची वाढती किंमत चुकवावी लागत असल्याचे निदर्शनाला आणून दिले आहे. जीवाश्म इंधनाचा व्यापार करणाऱ्या कंपन्या हवामान बदलाच्या संकटाला मोठ्या प्रमाणात जबाबदार असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. ही संकटे नैसर्गिक नाहीत, असे लंडनच्या इम्पेरियल कॉलेजच्या मानद प्राध्यापक जोआना हेग म्हणाल्या. "हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करण्यासाठी तातडीने कार्यवाही करून हवामान बदलाचे संकट कमी करता आली असते, पण जीवाश्म इंधनाचा वाढता वापर आणि राजकीय चालढकल यामुळे तसे झाले नाही. त्याची झळ सर्वसामान्यांना पोहोचत आहे," असे हेग यांनी सांगितले. २०२५मध्ये जगभरात सर्वाधिक हानीकारक नैसर्गिक संकटांमुळे झालेले एकत्रित नुकसान हे १२२ अब्ज डॉलर इतके आहे. यामध्ये केवळ मालमत्तेच्या नुकसानाचा विचार करण्यात आला आहे. जीवितहानीमुळे झालेले नुकसान मोजलेले नाही.

## अरवलीच्या नैसर्गिक स्वरूपाशी छेडछाड नाही!

■ राजस्थानच्या मुख्यमंत्र्यांची ग्वाही

**राजस्थान : (समर्थ गांवकरी)**

अरवली पर्वताच्या नैसर्गिक स्वरूपाशी कोणतीही छेडछाड करू देणार नाही, अशी ग्वाही राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी शनिवारी दिली. अरवली पर्वतरांगा राज्याचा अनमोल नैसर्गिक वारसा आहे, असे ते म्हणाले. मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी वन, पर्यावरण आणि खनिकर्म विभागाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. अरवलीमध्ये होणाऱ्या बेकायदा खनिकर्माविरुद्ध पोलिसांच्या सहयोगाने विशेष संयुक्त मोहीम आखण्यात यावी असे निर्देश त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले. अरवली पर्वतरांगांच्या बदललेल्या परिभाषेनंतर त्याच्या ९० टक्क्यापेक्षा अधिक भागांचे संरक्षण होणार नाही, तसेच अशा भागांमध्ये खनिकर्म आणि अन्य कृत्यांना परवानगी दिली जाईल, असा आरोप कॉंग्रेसने केला आहे. मात्र, मुख्यमंत्र्यांनी तो फेटाळला. "सरकारची भूमिका स्पष्ट आहे. अरवली भागात कोणत्याही नवीन खाणींना परवानगी दिली जाणार नाही. याबाबत केंद्राने जारी केलेल्या सूचनांची संपूर्ण अरवली पट्ट्यात एकसमान पद्धतीने अंमलबजावणी केली जाईल," असे शर्मा म्हणाले. सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व मार्गदर्शक सूचनांचेही काटेकोरपणे पालन केले जात आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तसेच २५० कोटींच्या हरित अरवली विकास प्रकल्पाअंतर्गत ३२ हजार हेक्टर जागेवर दाट झाडे लावली जातील, अशी माहितीही शर्मा यांनी दिली.



## भाजप नेत्याचा कारवाईचा इशारा

**डेहराडून : (समर्थ गांवकरी)**

भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस दुष्यंत कुमार गौतम यांनी अंकिता भंडारी हत्या प्रकरणात त्यांना गोवणाऱ्यांविरुद्ध मानहानीचा खटला दाखल करण्याचा इशारा दिला आहे. हरिद्वारच्या ज्वालापूर येथील माजी आमदार सुरेश राठोड यांची पत्नी असल्याचा दावा करणाऱ्या उर्मिला सनवर नावाच्या महिलेची प्रसारित झालेली चित्रफीत आणि ध्वनिफीत संभाषणावरून हा वाद उद्भवला आहे.


## 'सहाव्या इंद्रिया'च्या आधारे न्याय; बलात्कार प्रकरणात शिक्षा रद्द

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

सर्वोच्च न्यायालयाने एका दुर्मीळ निर्णयात, 'सहाव्या इंद्रिया'च्या आधारावर बलात्काराच्या आरोपाखाली १० वर्षांची शिक्षा भोगणाऱ्या एका पुरुषाची शिक्षा आणि त्याला दोषी ठरवणारा निकाल रद्द केला. सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले की या प्रकरणात सहमतीने झालेल्या संबंधांचा समावेश होता जो गैरसमजामुळे गुन्हा ठरवण्यात आला होता. 'जेव्हा हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयासमोर आले, तेव्हा प्रकरणातील तथ्ये विचारात घेतल्यानंतर, आम्हाला असे वाटले की जर अपीलकर्ता आणि पीडितेने एकमेकांशी लग्न करण्याचा निर्णय घेतला तर त्यांना पुन्हा एकदा एकत्र आणता येईल',असे न्या. बी. व्ही. नागरत्ना आणि सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने म्हटले. पक्षकारांनी या वर्षी जुलैमध्ये लग्न केले होते आणि तेव्हापासून ते एकत्र राहत होते.

५ डिसेंबरच्या निकालात न्यायालयाने म्हटले आहे की, हे दुर्मीळ प्रकरणांपैकी एक आहे जिथे या न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर, अपीलकर्त्याला त्याच्या दोन्ही शिक्षा रद्द करण्याचा फायदा झाला. मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या एप्रिल २०२४ च्या शिक्षेला स्थगिती देण्याच्या अर्जाला आव्हान देणाऱ्या एका पुरुषाच्या अपिलावर न्यायालयाने हा निर्णय दिला.








# जामखेडला जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धा संपन्न

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

जामखेड च्या जगदंबा मंगल कार्यालयात जिल्हास्तरीय सब ज्युनिअर तायक्वांदो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाभरातून 150 खेळाडूंनी सहभाग घेतला.

या स्पर्धेतील विजेते खेळाडू सिंधुदुर्ग येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. अशी माहिती अहिल्यानगर जिल्हा तायक्वांदो संघटनेचे सचिव संतोष बारगजे यांनी दिली.

तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडिया अंतर्गत तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र मुंबई संघटनेच्या मान्यतेने सिंधुदुर्ग येथे ते 27 व 28 डिसेंबरला 35 व्या महाराष्ट्र राज्य सब ज्युनिअर तायक्वांदो स्पर्धा होणार आहे. या अनुषंगाने अहिल्यानगर जिल्हा तायक्वांदो संघटनेच्या वतीने जगदंबा मंगल कार्यालय




खर्डा रोड जामखेड येथे रविवारी अहिल्यानगर जिल्हा सबज्युनियर तायक्वांदो स्पर्धा 2025 चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नागेश विद्यालय स्कूल कमिटीचे सदस्य हरिभाऊ बेलेकर, नागेश विद्यालय स्कूल कमिटीचे सदस्य तसेच संत गोरोबाकाका पतसंस्थेचे चेअरमन विनायक राऊत, अहिल्यानगर जिल्हा तायक्वांदो संघटनेचे अध्यक्ष डॉ. एकनाथ मुंडे उपाध्यक्ष अलताफ कडकाले, संजय बेरड, नागेश विद्यालयाचे क्रीडा शिक्षक आबासाहेब जायगुडे, घनश्याम डूचे, आनंद राजगुरू आदींच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्‌घाटन पार पडले. या स्पर्धेमध्ये विविध वजन गटातील विजेते खेळाडू पुढीलप्रमाणे : मुले - 18 किलो वजन गट श्री उदबत्ते, 21 किलो ऍलेक्स अवसरमल 23 किलो विराट पाटील 25 किलो शिवांश धामणे 27 किलो राजेश भिंगारदिवे 29 किलो आरव शिंदे 32 किलो शिवम वाघमारे 35 किलो सिद्धांत त्रिपाठी 38 किलो सोमेश्वर कदम 41 किलो ओम ठोंबरे 44 किलो आयुष भुजबळ 50 किलो रणवीर चव्हाण 50 किलो वरील शिवतेज येवले

मुली - 16 किलो वजन गट गार्गी आकडे 18 किलो शैशा मगर 20 किलो वेदांती दळवी 22 किलो स्वाती खाडे 24 किलो केतकी सरोदे 26 किलो अनुजा सुकळकर 29 किलो समृद्धी भोसले 32 किलो दीक्षा साळवे 35 किलो सृष्टी उदमले 38 किलो आराध्या पवार 41 किलो गार्गीश्री पवार 47 किलो गौरी खर्डेकर 47 किलो वरील वजन गट आस्ता पवार

वरील सर्व खेळाडू सिंधुदुर्ग येथे होणाऱ्या राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. असे श्री. बारगजे यांनी सांगितले. या खेळाडूंना सुरेश वाघ, शकील सय्यद, दिनेशसिंह राजपूत, महेश मुरादे, अंबादास साठे, गोरक्षनाथ गालम, रवी यादव गणेश धीवर सागर सानप पायल असलकर आदींचे मार्गदर्शन लाभले.

# उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची शिर्डीचे अपक्ष नगरसेवक अमित शेळके यांनी घेतली भेट



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. ना. श्री अजित (दादा) पवार साहेब यांची शिर्डी नगरपरिषद निवडणूक २०२५ मध्ये निवडून आलेले अपक्ष नगरसेवक तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ते श्री अमित कैलासराव शेळके पाटील यांनी आज पुणे येथील बारामती होस्टेल येथे सदिच्छा भेट घेतली.

यावेळी शिर्डी नगरपरिषदेच्या निवडणुकीसह शहराच्या विकासकामांबाबत सविस्तर चर्चा झाली. शहराच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करून जनतेसाठी चांगले व गुणवत्तापूर्ण काम करा, असा संदेश उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी दिला. तसेच अमित शेळके यांच्या सामाजिक व राजकीय कार्याची दादांनी कौतुकाची थाप देत प्रशंसा केली.

अमित शेळके हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या माध्यमातून अनेक दिवसांपासून सक्रिय असून ते सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सातत्याने सोडवण्यासाठी कार्यरत आहेत. त्यांच्या या कामगिरीची दखल घेत दादांनी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वाढदिवसानिमित्त चितळवेढे येथे मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर!

**(समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वाढदिवसानिमित्त पद्मश्री डॉ. मनोहर डोळे मेडिकल फाउंडेशन व Galaxy Super Speciality Eye Hospital यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी, निदान व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर सोमवार, दिनांक २९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी २.०० या वेळेत ग्रामपंचायत कार्यालय, चितळवेढे, ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथे संपन्न होणार आहे. शिबीरासाठी अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज मोबाईल आय क्लिनिक (फिरता दवाखाना) उपलब्ध राहणार आहे.

उपलब्ध उपचार व सेवा :

कॉम्प्युटराईज्ड नेत्र तपासणी

अत्याधुनिक लेसर मशीनद्वारे (विना टाका, विना भुल, विना पट्टी) मोतीबिंदूची फेको शस्त्रक्रिया

बुबुळा वरील पडदा व डोळ्यांच्या मागील पडद्याची (रेटिना) तपासणी व शस्त्रक्रिया

लासरू/टाक्याची व बिनटाक्याची शस्त्रक्रिया

काचबिंदू उपचार व शस्त्रक्रिया

चष्याचा नंबर कायमचा घालविण्यासाठी लेसिक लेसर शस्त्रक्रिया या शिबिरात कॉम्प्युटरद्वारे नेत्र तपासणी करून नंबरचा चष्मा मोफत देण्यात येणार आहे. मोतीबिंदू निदान झाल्यास त्याच दिवशी शस्त्रक्रियेसाठी नेण्यात येईल. शस्त्रक्रियेसाठी जाणाऱ्या रुग्णांसाठी प्रवास, जेवण व एका दिवसाच्या राहण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. (घरचा मोबाईल नंबर सोबत असणे आवश्यक आहे.)

**इतर सुविधा**

सर्व कंपन्यांची मेडिक्लेम सुविधा उपलब्ध या सामाजिक उपक्रमासाठी चितळवेढे ग्रामपंचायत, विद्यमान सरपंच-उपसरपंच, सर्व सदस्य, ग्रामविकास अधिकारी, आशा आरोग्य स्वयंसेविका व समस्त ग्रामस्थ मंडळी यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ७८८८१७८२३२ सामाजिक जाणिवेतून गरजू रुग्णांना लाभ होण्यासाठी हा संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पाणी पुरवठा सुरळीत ठेवावा

**श्रीरामपुरः (समर्थ गांवकरी)**

श्रीरामपूर नगरपालीकेने शहराला नुकताच दिवसाआड पाणीपुरवठा करण्याची घोषणा केली आहे. परंतु शहरात २५ डिसेंबर ते ३१ डिसेंबर पर्यंत नाताळ व नवीन वर्ष मोठ्या उत्साहात साजरे केले जाते विशेषकरून शहराच्या प्रभाग क्रमांक ३मध्ये ख्रिस्ती कुटुंबे मोठ्या संख्येने राहत आहेत व दरवर्षी ते नाताळसण व नवीनवर्ष मोठ्या प्रमाणात साजरे करतात . प्रामुख्याने संतलुक्स हॉस्पीटल परिसर , बोरावकेनगर , रेव्हेन्यू कॉलनी , अतिथी कॉलनी , पठाण वस्ती , आशिर्वादनगर वगैरे परिसरात ख्रिस्ती बांधव मोठ्या प्रमाणात राहतात . तरी सदर प्रभागात ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत श्रीरामपूर नगरपालिकेने दररोज पाणी पुरवठा करावा अशी आग्रही मागणी अँड प्रमोद सगळगिळे तसेच समाज बांधव यांनी केली आहे.

# विद्यार्थ्यांच्या वाहतूक सुरक्षिततेबाबत सूचना जाहीर कराव्यात

**भाऊ चासकर यांची मागणी**

**(समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद तसेच अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना विज्ञान प्रदर्शन, क्रीडा स्पर्धा, शिष्यवृत्ती व नवोदय प्रवेश परीक्षा, आधार कार्ड अद्ययावत करणे आदी विविध कारणांसाठी केंद्र, बीट, तालुका व जिल्हा पातळीवर उपस्थित राहणे बंधनकारक केले जाते. मात्र या सर्व उपक्रमांदरम्यान विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी शासनाकडून कोणतीही ठोस व्यवस्था करण्यात आलेली नसून, या संदर्भात स्पष्ट धोरण अथवा मार्गदर्शक सूचना उपलब्ध नाहीत, ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे मत शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते भाऊ चासकर यांनी व्यक्त केले आहे.

ग्रामीण भागात एसटीसारखी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अनेकदा वेळेवर किंवा पुरेशी उपलब्ध नसते. अशा परिस्थितीत केवळ विद्यार्थ्यांना उपस्थित ठेवण्याचे आदेश दिले जातात; मात्र प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे ने-आण कशी करावी, याबाबत प्रशासनाकडून कोणतीही ठोस दिशा दिली जात नाही. दुसरीकडे, पालक रोजीरोटीसाठी कामावर असल्याने प्रत्येक वेळी विद्यार्थ्यांसोबत जाणे त्यांना शक्य होत नाही, हीही वास्तव परिस्थिती असल्याकडे चासकर यांनी लक्ष वेधले आहे.

खोडाळा तालुक्यात (जिल्हा पालघर) नुकत्याच झालेल्या क्रीडा स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना पिकअप वाहनातून नेत असताना वाहन उलटून झालेल्या अपघातात आठ विद्यार्थी जखमी झाल्याची घटना



गंभीर आहे. ग्रामीण आदिवासी भागात विद्यार्थ्यांची ने आण करण्यासाठी सर्रास पिक अप सारख्या वाहनांचा वापर केला जातो. मात्र अशा प्रकारचा अपघात घडल्यावरच या विषयावर चर्चा सुरू होते. त्यानंतर संपूर्ण जबाबदारी मुख्याध्यापक व शिक्षकांवर निश्चित करून कारवाई केली जाते, तर प्रशासन मात्र नामानिराळे राहते. ही भूमिका मुख्याध्यापक व शिक्षकांवर अन्यायकारक असून, यामध्ये स्पष्टता आणण्यासाठी शासनाने नियमावली तयार करण्याची आवश्यकता असल्याचे मत चासकर यांनी व्यक्त केले.

शालेय विद्यार्थ्यांच्या सहलींसाठी जशा स्पष्ट मार्गदर्शक सूचना शासनाने जारी केलेल्या आहेत, त्याच धर्तीवर परीक्षा, शैक्षणिक उपक्रम, स्पर्धा व अन्य अनिवार्य कार्यक्रमांसाठी विद्यार्थ्यांची वाहतूक कशी करावी, कोणत्या सुरक्षिततेच्या निकषांवर करावी, जबाबदारी कोणाची असेल, याबाबत तातडीने स्पष्ट व बंधनकारक मार्गदर्शक सूचना जाहीर कराव्यात, अशी ठाम मागणी भाऊ चासकर यांनी केली आहे.

विद्यार्थी सुरक्षेबाबत अलीकडेच शासनाने अध्यादेश काढलेला असताना, विद्यार्थ्यांच्या वाहतूक सुरक्षिततेसारखा अत्यंत महत्त्वाचा विषय अपघातानंतर चर्चेचा मुद्दा न राहता, पूर्वनियोजन व धोरणात्मक निर्णयांचा भाग व्हावा, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

# रस्ता चोरीला गेला का? – के.ए. ग्रुप अकोलेचा सवाल!

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील कळंब फाटा ते कळंब गाव (ता. अकोले) या रस्त्याच्या दयनीय अवस्थेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीवर तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींवर अविश्वास निर्माण झाला आहे. डॉ. किरण लहामटे यांना या रस्त्याबाबत माहिती असूनही प्रश्न मार्गी न लागल्याने नाराजी वाढत आहे, असा आरोप के.ए. ग्रुप अकोले ने केला आहे.

के.ए. ग्रुप अकोलेने स्पष्ट इशारा दिला आहे की, सात दिवसांत रस्त्याचे काम सुरू न झाल्यास अकोले तालुक्यातील प्रत्येक गावात अविश्वास व परिवर्तन स्वाक्षरी मोहीम राबवण्यात येईल. कळंब फाटा परिसरात वारंवार अपघात होत असून, सुदैवाने जीवितहानी टळत असली तरी आर्थिक नुकसान



व गंभीर दुखापती होत आहेत. गेल्या तीन वर्षांत या ठिकाणी अनेक दुर्घटना घडल्या आहेत.

याच वर्षी अक्षय तृतीयेला कळंब फाटा येथे के.ए. ग्रुप अकोलेच्या नेतृत्वाखाली कळंब, करंडी व मन्याळे गावच्या ग्रामस्थांनी तब्बल तीन तास तीव्र रस्ता रोको आंदोलन केले होते. 2024 च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी येथे केवळ खडी टाकण्यात आली होती. त्या वेळी प्रशासनाने त्वरित रस्त्याचे काम सुरू करण्याचे आश्वासन दिले होते; मात्र प्रत्यक्षात फक्त सिमेंट पाईप टाकण्यात आले आणि पुढील काम रखडले.

कळंब गावातील के.ए. ग्रुपचे पदाधिकारी अरुण भरत गोंदके, आदित्य लोहकरे यांनी ठेकेदार देवराम लांडे यांच्याशी संपर्क साधला असता, "माणसं भात कापायला गेली आहेत, माणसं भेटत नाहीत" अशी कारणे देत दोन महिने उलटल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर "तुम्ही मुरूम पाहून द्या" असे उत्तर मिळाल्याचा आरोप पदाधिकाऱ्यांनी केला आहे. विशेष म्हणजे हा रस्ता डांबरीकरणासाठी मंजूर असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागचे अभियंता चव्हाण यांनी "दसऱ्यानंतर काम सुरू करू" असे आश्वासन दिले होते; मात्र ते प्रत्यक्षात उतरले नसल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत. लोकप्रतिनिधी म्हणून आमदारांनी लक्ष न दिल्याने "गावातून मतदान कमी झाले म्हणून दुर्लक्ष होत आहे का?" असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर "रस्ता चोरीला गेला आहे का?" असा संतप्त सवाल नागरिकांकडून केला जात असून, प्रशासनाने तातडीने दखल घेऊन प्रत्यक्ष काम सुरू करावे, अशी जोरदार मागणी होत आहे.

# रोबोटिक टेलीसर्जरी मॅरेथॉनचे आयोजन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारताची पहिली स्वदेशी सर्जिकल रोबोटिक प्रणाली एसएसआयआय मंत्रा विकसित करणाऱ्या एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनल इन्क. ने १०० रोबोटिक टेलीसर्जरी यशस्वीरीत्या पूर्ण केल्याची ऐतिहासिक घोषणा केली आहे. हा टप्पा तंत्रज्ञान-सक्षम आरोग्यसेवांच्या उत्क्रांतीतील एक महत्त्वपूर्ण पाऊल असून, स्वदेशी नवकल्पनांच्या माध्यमातून प्रगत शस्त्रक्रिया कौशल्ये दूरवर विश्वासार्हपणे पोहोचवता येतात, हे अधोरेखित करतो. या यशाच्या निमित्ताने, एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनलने भारताची पहिली रोबोटिक टेलीसर्जरी मॅरेथॉन आयोजित केली, ज्यादरम्यान एका दिवसात २० हून अधिक टेली-सक्षम रोबोटिक शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आल्या.

# डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वाढदिवसानिमित्त चितळवेढे येथे शासकीय योजनांचा विशेष कॅम्प!

**(समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने चितळवेढे गावात सोमवार, दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी शासकीय योजनांचा विशेष कॅम्प आयोजित करण्यात आला आहे. हा कॅम्प सकाळी १० वाजता ग्रामपंचायत कार्यालय, चितळवेढे येथे होणार आहे.

या कॅम्पमध्ये ग्रामस्थांसाठी विविध महत्त्वाच्या शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामध्ये उत्पन्न दाखला, डोमिसाईल व नॅशनॅलिटी, जातीचा दाखला, नॉन क्रिमिनल प्रमाणपत्र आदी शासकीय दाखले काढण्याची सुविधा असणार आहे. तसेच रेशन कार्डमध्ये नाव कमी–समाविष्ट करणे, शिधापत्रिका ऑनलाईन करणे व नवीन



शिधापत्रिकेसाठी अर्ज करण्याची सोयही करण्यात आली आहे.

याशिवाय आधार कार्ड अपडेट, बायोमेट्रिक अपडेट, मोबाईल नंबर अपडेट तसेच १८ वर्षांखालील नागरिकांसाठी नवीन आधार कार्ड काढण्याची सुविधाही या कॅम्पमध्ये उपलब्ध असणार आहे. नवीन शिधापत्रिकेसाठी हमीपत्र, तलाठी उत्पन्न दाखला, तलाठी रहिवासी दाखला, विभक्त पंचनामा, घराचा उतारा, कुटुंबातील सर्व सदस्यांचे आधार कार्ड झेरॉक्स व बँक पासबुक झेरॉक्स अशी आवश्यक कागदपत्रे सोबत आणण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या उपक्रमासाठी आभाळे सेतू कार्यालयाचे संचालक अक्षय आभाळे यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या शासकीय कॅम्पचा लाभ घेण्यासाठी चितळवेढे व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

**डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते पिसेवाडी विलासनगर**

# शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गोड भोजन वाटप!



**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील मुळा परिसरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिसेवाडी विलासनगर येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य व गोड भोजन वाटपाचा उपक्रम उत्साहात पार पडला. हा उपक्रम डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या पुढाकारातून राबविण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास शाळेतील शिक्षक, विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. समाजातील जबाबदार घटकांनी शिक्षणासाठी पुढाकार घेणे ही काळाची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. अशा सामाजिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागून त्यांचा आत्मविश्वास वाढतो, असेही यावेळी सांगण्यात आले.

# ब्राम्हणवाडा गावाच्या मानाच्या काठीचा हळद समारंभ उत्साहात

**कोरठण खंडोबा यात्रोत्सवाला भक्तीचा बहर!**

**ब्राम्हणवाडा : (समर्थ गांवकरी)**

दिनांक ३ जानेवारी ते ५ जानेवारी दरम्यान होणाऱ्या कोरठण खंडोबा देवस्थान येथील वार्षिक यात्रोत्सवाला प्रारंभ होण्यापूर्वीच धार्मिक वातावरण निर्मिती झाली असून, या यात्रेतील अत्यंत मानाचा समजला जाणारा ब्राम्हणवाडा गावाच्या मानाच्या काठीचा हळद समारंभ मोठ्या उत्साहात व पारंपरिक पद्धतीने संपन्न झाला.

कोरठण खंडोबा यात्रेला पंचक्रोशीसह दूरदूरच्या भागातून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. या यात्रेत अनेक धार्मिक विधी पार पडतात; मात्र त्यामध्ये ब्राम्हणवाडा गावाच्या मानाच्या काठीच्या सोहळ्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हा मान शेकडो वर्षांपासून परंपरेने चालत आलेला असून, आजही तो तितक्याच श्रद्धेने जपला जात आहे.

मानाच्या काठीचा ऐतिहासिक वारसा : ब्राम्हणवाडा गावातील गायकर भक्तांना मानाच्या काठीचा मान पारंपरिकरीत्या मिळालेला आहे. लोककथेनुसार, गायकर भक्ताने आपल्या निष्ठेचे व समर्पणाचे प्रतीक म्हणून खंडोबा मंदिराच्या कळसावरून उडी घेतली होती. या अद्वितीय बलिदानाच्या स्मरणार्थ त्यांची प्रतिमा कोरठण खंडोबा मंदिराच्या गाभाऱ्याच्या प्रवेशद्वारात आजही पाहायला मिळते. त्यामुळे मानाच्या काठीकडे केवळ धार्मिक नव्हे,




तर ऐतिहासिक आणि भावनिक दृष्टीनेही पाहिले जाते.

दिनांक २६ डिसेंबर रोजी ब्राम्हणवाडा गावात मानाच्या काठीचा हळदी समारंभ पार पडला. या वेळी पंचक्रोशीतील महिला भगिनी, ग्रामस्थ व भाविकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती लावली. पारंपरिक वेशभूषा, ओव्या, देवाची पारंपारिक गीते आणि ढोल-ताशांच्या गजरात संपूर्ण गाव भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाले होते. हळदी समारंभानंतर मानाच्या काठीची भव्य मिरवणूक काढण्यात आली.

मानाची काठी ब्राम्हणवाडा गावातून निघून बेलापूर, जाचकवाडी, बोटा, नळावणे, येथून नांदूर पठार गावात गेल्यानंतर ग्रामस्थांकडून भव्य मिरवणूक काढण्यात येते त्यानंतर कोरठण गडाकडे मार्गस्थ होते. या मिरवणुकीत ग्रामस्थ, महिला भगिनी, तरुण वर्ग व भाविक मोठ्या संख्येने सहभागी होतात. कोरठण गडावर पोहोचल्यानंतर काठीची भव्य प्रदक्षिणा, शासकीय महापूजा आणि देवाचा मान देण्याचा विधी अत्यंत विधिवत पार पडतो.

मानाच्या काठीपाशी पारंपरिक जागरण-गोंधळ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. पूर्वी हा गोंधळ चांगदेव अनाजी शिंदे सादर करत असत. सध्या त्यांचे सुपुत्र शाहीर नामदेव शिंदे ही परंपरा पुढे नेत असून, शिव–मल्हार जागरण गोंधळ पार्टीच्या सादरीकरणामुळे भाविक मंत्रमुग्ध झाले. रात्री उशिरापर्यंत चाललेल्या या कार्यक्रमाने यात्रोत्सवात अधिकच रंगत आणली. ब्राम्हणवाडा गावाची मानाची काठी ही केवळ धार्मिक विधी नसून, ती श्रद्धा, परंपरा आणि सामाजिक एकात्मतेचे प्रतीक मानली जाते. पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली ही परंपरा आजही तितक्याच निष्ठेने जपली जात असल्याने कोरठण खंडोबा यात्रेचा आत्मा अधिक बळकट होत आहे.

**यात्रोत्सवासाठी पंचक्रोशीत उत्सुकता शिगेला**

आगामी कोरठण खंडोबा यात्रोत्सवासाठी गावात व पंचक्रोशीत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. मानाच्या काठीची मिरवणूक, जागरण-गोंधळ, विविध धार्मिक कार्यक्रम आणि यात्रेतील वातावरण हे भाविकांसाठी आध्यात्मिक आनंद व समाधान देणारे ठरणार आहे.

# पुण्यतिथी निमित्त इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा संपन्न

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

ओतूर येथील ग्राम विकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयामध्ये ठाणे जिल्ह्याचे माजी आमदार,ओतूरचे सुपुत्र स्वर्गीय डी के राजर्षी यांच्या ४९ व्या पुण्यतिथी निमित्त इंग्रजी वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.

दरवर्षी डिसेंबर महिन्यामध्ये शाळेतील पाचवी ते दहावीच्या तीन गटांमध्ये ही स्पर्धाआयोजित केली जाते.विद्यार्थ्यांच्या मनातील परकीय भाषेबद्दल असलेला न्यूनगंड दूर व्हावा,इंग्रजी भाषेबद्दल आवड निर्माण व्हावी या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित केली जाते.

या स्पर्धेत विद्यालयातील ८०विद्यार्थी सहभागी झाले होते. तिन्ही गटांमध्ये अनुक्रमे पर्यवेक्षक अनिल उकिरडे,इंग्रजी विभाग प्रमुख भाऊसाहेब खाडे, उप मुख्याध्यापक संजय हिरे यांचे अध्यक्षतेखाली स्पर्धा संपन्न झाली.



यावेळी संस्थेचे सचिव प्रदीप गाढवे, सहसचिव पंकज घोलप उपस्थित होते. अशी अशी माहिती विद्यालयाचे इंग्रजी विभाग प्रमुख भाऊसाहेब खाडे यांनी दिली स्पर्धेचा गटनिहाय निकाल खालील प्रमाणे लहान गट.राजनंदिनी पंकज घोलप (प्रथम क्रमांक,६वी )स्वरा छगन पानसरे(द्वितीय क्रमांक,५वी ,स्वरा आदिनाथ धुमाळ(तृतीय क्रमांक,६वी),श्लोक विशाल तांबे(उत्तेजनार्थ,५वी )समर संजय शिंदे(उत्तेज नार्थ,६वी )

मध्यम गट:-वरद रामदास डोंगरे(प्रथम क्रमांक, ७वी),आरुष संतोष कांबळे(द्वितीय,७वी)तृतीय क्रमांक विभागून अपूर्व प्रदीप गाढवे (८वी ),चिन्मय अभिजीत डुंबरे (७वी)उत्तेजनार्थ सृष्टी महादेव तौर(८वी) आराध्य प्रभाकर दिघे (८वी)*मोठा गट:-प्रणव संपत तांबे( प्रथम क्रमांक,१०वी ),पलक रामदास डोंगरे(द्वितीय क्रमांक,९वी), आराध्य भाऊसाहेब खाडे(तृतीय क्रमांक,१०वी)या स्पर्धेचे परीक्षक म्हणून मंगेश तांबे, वनिता भोर,आसावरी गायकर,शिल्पा भालेराव,रसिका शेळके,आशा डुंबरे यांनी काम पाहिलेकार्यक्रम यशस्वी होण्यासाठी भगवंता घोडे,विजया गडगे,अजित डांगे, संतोष कांबळे,राजाराम शिंदे,बाळासाहेब साबळे, संतोष सोनवणे,देवचंद नेहे,लक्ष्मण दुडे,विशाल चौधरी, दिनेश ताठे,मिलिंद खेत्री,आशा गाडेकर,सोनाली माळवे,सोनाली कांबळे,सरस्वती भताने,विजय खरात, रामदास ठोसर,प्रसन्न तांबे,योगेश फापाळे,ईश्वर ढमाले, तेजस ढमाले,अरविंद आंबरे,दीपक हांडे आदींनी सहकार्य केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अजित डांगे तर सूत्रसंचालन दिनेश ताठे यांनी केले.लक्ष्मण दुडे यांनी आभार मानले.

# जि. प. प्राथमिक शाळा वडगाव आनंद शाळेची गरुडझेप

**वडगाव आनंद : (समर्थ गांवकरी)**

शतकोत्तर वाटचाल करणाऱ्या वडगाव आनंद येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने स्वानंदी शिक्षण संगणक शिक्षण, कराटे, योगा, विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र डायनिंग हॉल, पिण्याच्या पाण्यासाठी अल्कलाइन वॉटर फिल्टर, विद्यार्थ्यांची दप्तरे ठेवण्यासाठी स्वतंत्र लॉकर्स, औषधी वनस्पती व फुले तसेच फळझाडांनी समृद्ध व नटलेली शाळा. संगणक, वाचनालय, चित्रकला अशा विषयांसाठी स्वतंत्र शिक्षकाची नेमणूक अशा अनेक उपक्रमांद्वारे जिल्हासमोर नव्हे तर राज्यसमोर एक वेगळा आदर्श ठेवला आहे आणि यामुळेच इयत्ता पहिली मध्ये प्रवेश मिळावा यासाठी वेटींग मध्ये असणारी अशी शाळा. शाळेची स्थापना सन १८८३यावर्षी झाली असून शाळा २०१४ पर्यंत जुन्या इमारतीत भरत होती परंतु २०१३-१४ यावर्षी एम्पथी फाउंडेशन मुंबई व पुणे जिल्हा परिषद यांच्या



संयुक्त विद्यमाने शाळेची भव्य दिव्य अशी इमारत उभी राहिली, त्यात भर पडली ती शाळेचे शिक्षण तज्ञ सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते डी बी नाना वाळुंज यांनी आपल्या आई बाबांच्या स्मरणार्थ तसेच दप्तराचे ओझे मुक्त करण्यासाठीबोर्यक वर्गात ४२ लॉकर्स तसेच धूळ विरहित वर्ग असावा यासाठी प्रत्येक वर्गात फर्निचर करून दिले, या शाळेच्या प्रांगणात प्रवेश करताच आपणास कोकणात आल्याचा भास होताना प्रांगणात आंबा, चिकू, फणस, पळस, बकुळ, पिंपळ, वड, मोह, बदाम, जांभूळ, अशा कितीतरी झाडांनी नटलेली वनराई आपले जणू स्वागतच करते की काय असे वाटते. या प्रांगणातील विविध झाडांचा आपल्याला काय उपयोग होतो, हे सुद्धा मुलांना सांगितले तसेच शिकविले जाते. शाळेच्या अभ्यासक्रमावरच विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढण्यासाठी सर्व पातळीवरील स्पर्धा परीक्षांसाठी मुलांना प्रोत्साहित केले जाते, मंथन व ब्रेन डेव्हलपमेंट या परीक्षांमध्ये मुलांनी गेली अनेक वर्षे सुवर्णपदकापर्यंत मजल मारली आहे.

# महसूल यंत्रणेच्या दुर्लक्षाचा फायदा घेत ब्राम्हणवाड्यात मातीची सर्रास अवैध वाहतूक!

**ब्राम्हणवाडा : (समर्थ गांवकरी)**

दिनांक २१ डिसेंबर पासून ब्राम्हणवाडा गावात महसूल विभागाच्या स्पष्ट दुर्लक्षामुळे गौण खनिजाची (माती) अवैध वाहतूक झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. गावात तीन डंपर व एक जेसीबी मशीनच्या सहाय्याने माती उत्खनन करून ती थेट वीटभट्ट्यांवर टाकण्यात आली आहे. या संपूर्ण वाहतुकीसाठी रॉयल्टी भरली आहे की नाही, भरली असल्यास ती किती वाहनांसाठी होती, याची सखोल चौकशी करण्यात यावी, तसेच संबंधित वीटभट्टी मालकाने उत्खनन व वाहतुकीसाठी आवश्यक परवानगी घेतली होती का, याचीही तपासणी होणे अत्यंत आवश्यक आहे.



जर ही माती अनाधिकृतरीत्या वाहून नेण्यात आली असेल, तर ती कोणाच्या आदेशाने टाकण्यात आली, तसेच यामागे ब्राम्हणवाडा गावचे तलाठी यांनी दुर्लक्ष का केले. संबंधित सर्व वीटभट्ट्या तसेच माती वाहतूक करणाऱ्या डंपर मालकांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी.

विशेष म्हणजे, ब्राम्हणवाडा परिसरात यापूर्वीही अवैध रेती, वाळू वाहतूक तसेच खडी क्रशरची वाहने सर्रासपणे सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने येत आहेत. अनेक डंपरवर नंबर प्लेट नसणे, तर काही वाहने विनापरवाना सुरू असल्याचेही निदर्शनास आले आहे.

काही वाहने Public Works Department (पीडब्ल्यूडी) च्या कामासाठी सुरू असल्याचे सांगितले जात असून, त्यांच्या समोरील काचेवर विभागाचा परवाना लावलेला आढळतो. मात्र उर्वरित डंपर वाहने अनधिकृतरीत्या वापरात असल्याचा संशय नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे. या सर्व प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी करून दोषींवर कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यावी, तसेच अवैध खनिज वाहतुकीवर कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी महसूल यंत्रणेने ठोस व प्रभावी पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी ब्राम्हणवाडा गावातील नागरिकांकडून होत आहे.

# अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**वडाळा महादेव : (समर्थ गांवकरी)**


श्रीरामपूर तालुक्यातील कारेगाव येथील भाऊसाहेब भवार पाटील सांस्कृतिक सभागृह या ठिकाणी वैकुंठवासी श्री ह भ प बन्सी महाराज कावले यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्ताने ब्रह्मलीन सद्गुरु गंगागिरीजी महाराज सद्गुरु किसनगिरी महाराज गुरुवर्य नारायणगिरीजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे दिनांक २५ डिसेंबर ते १ जानेवारी या कालावधीत पहाटे ५ ते ७ काकडा हरिपाठ भजन ८ ते ११ पारायण दुपारी भजन हरीपाठ सायंकाळी श्रीमद् भागवत कथा - कथाकार ह भ प बालयोगी ऋषिकेश जी महाराज वाकचौरे जनाई गुरुकुल गोंधवणी यांच्या सुश्राव्यवाणीतून होणार आहे.

# भीमाशंकरमध्ये भाविक असुरक्षित; सुरक्षारक्षकांच्या मारहाणीच्या तक्रारी!

**(समर्थ गांवकरी)**

श्री क्षेत्र भीमाशंकर येथे पवित्र शिवलिंगाच्या दर्शनासाठी येणा-या भाविकांना मंदिर विश्वस्तांसमोर सुरक्षारक्षकांकडून सर्रासपणे मारहाण केली जात आहे. याबाबत काही भाविक सोशल मिडियावर चित्रफित टाकत आहेत. तर काही भाविकांनी खेड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करत आहे. त्यामुळे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एकमेव असलेल्या भीमाशंकर येथे कोणाच्या आशिर्वादाने सुरक्षा रक्षकांचा गुंडाराज सुरू आहे, असा आरोप भाविक करत आहे.

श्री क्षेत्र भीमाशंकर येथे स्थानिक आदिवासी तरूण मुलांची सुरक्षारक्षक नेमणूक न करता भीमाशंकर देवस्थानने पंढरपूर येथील खाजगी मुले - मुली यांची पहारा देणे, प्रवेश नियंत्रण करणे, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे आणि आपत्कालिन परिस्थितीत मदत करणे



यासाठी नेमणूक केली आहे. जेणे करून सुरक्षा आणि शांतता राखली जाईल. मात्र आपली नेमणूक कशासाठी केली याचे कर्तव्ये विसरून पंढरपूर येथील सुरक्षारक्षक भाविकांकडून पैसे घेत पवित्र शिवलिंगाच्या दर्शनासाठी सोडत आहे. अन् याबाबत एखादया जागृत भाविकांनी त्यांना जाब विचारला तर येथील नेमणूकीस असलेले सुरक्षा रक्षक जेश्ठ नागरिक, महिला, लहान मुले यांच्या बरोबर भांडत करत, मारहाण करत जमिनीवर ढकलून देत आहे. अन् मारहाणीबाबत भाविकांनी मोबाईलच्या माध्यमातून शुटींग काढण्याचा प्रयत्न केल्यास त्याचा मोबाईल हातातून हिसकावून घेत जमिनीवर फेकून देत मोबाईलचे नुकसान करत आहे. अन् परत भाविक रांगेत उभे न राहता येथून दर्शनासाठी जाण्यासाठी आग्रह करत होते, म्हणून आंम्ही हे केले असल्याचा कांगावा करतात. हा सर्व प्रकार सर्रासपणे भीमाशंकर मंदिर संस्थान देवस्थानच्या विश्वस्तांसमोर होत आहे. मात्र यावर कोणताही विश्वस्त संबंधित सुरक्षारक्षाकांवर कारवाई न देता पाठीशी घालत आहे.

दरम्यान श्री क्षेत्र भीमाशंकर येथे विविध राज्यातून भाविक यांच्याबाबत सर्रासपणे घडत असल्याने ते पोलीस ठाण्यात तक्रार न देता सोशल मिडियावर मारहाणीची चित्रफित टाकत आपली भीमाशंकर देवस्थानबाबत नाराजी व्यक्त करत आहे. तर काही भाविकांनी खेड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्या असून त्याचा तपास चालू आहे. याबाबत पोलिस प्रशासन व स्थानिक ग्रामस्थांनी देवस्थान विश्वस्त यांना सुरक्षारक्षकांकडून भाविकांना होत असलेल्या अशोभनिय वागणूकीबाबत वारंवार माहिती दिली. परंतु ते याकडे दुर्लक्ष करत असल्याचे नागरिकांनी सांगितले. याबाबत देवस्थान अध्यक्ष अ‍ॅड. सुरेश कौदरे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क झाला नाही.

# एकल महिलांना आदिवासी फडकी वाटप

**एकदरे : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील दुर्गम भागात असलेले व जिल्हा सीमेवरील सर्वात शेवटचे गाव जायनावाडी बिताका येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रामपंचायत जायनावाडी बिताका येथे विधवा एकल महिलांना फडकी वाटप करण्यात आले.ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या एकल महिलांचा विकास व विविध योजनांचा लाभ एकल महिलांना मिळवून देणे या उद्देशाने गावातील एकल महिलांची माहिती ग्रामपंचायत स्तरावर संकलित करण्यात आली.यानंतर ग्रामपंचायत जायनावाडी बिताका यांनी १५ टक्के महिला व बालविकास खर्च अंतर्गत तरतुदी नुसार गावातील सर्वेक्षण करण्यात आलेल्या एकल महिलांना आदिवासी फडकी वाटप करण्याचे निश्चित करण्यात आले.अशा प्रकारे




जायनावाडी व बिताका या दोन्ही गावातील सर्व एकल महिलांना हा लाभ देण्यात आला.यापुढेही एकल महिलांचा विकास होणेकामी व त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी महिला बचत गट,विविध योजनांच्या माध्यमातून लाभ मिळवून देण्यासाठी ग्रामपंचायत प्रयत्नशील राहील असे ग्रामपंचायतीच्या वतीने सांगण्यात आले.एकल महिलांच्या विकासासाठी एकत्र येऊन बचत गटातून विविध उपाययोजना उद्योग सुरु करण्यात आले पाहिजे.आपण आपल्या गटातून विविध व्यवसाय सुरू करून त्याचे विस्तारीकरण बाहेर कसे होईल हे सांगण्यात आले.

यावेळी उपस्थित ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी विशाल धांडे,पेसा अध्यक्ष काळू भांगरे, रोहिदास भांगरे,सोमनाथ भांगरे,अशोक भांगरे, पांडुरंग भांगरे,गोरख भांगरे,विठ्ठल पेढेकर, ग्रामपंचायत कर्मचारी,शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती गवळी,अंगणवाडी सेविका अलका भांगरे, व जायनावाडी बिताका येथील एकल महिला उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामविकास अधिकारी विशाल धांडे यांनी केले.

# नदीत बुडून वैभव यांचा मृत्यू

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव तालुक्यातील साकोरे येथे नदीत बुडून एका ४६ वर्षीय व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शनिवारी दि. २७ सकाळी उघडकीस आली आहे. वैभव बबन कडुसकर (वय ४६, रा. साकोरे, ता. आंबेगाव,) असे मयत व्यक्तीचे नाव आहे. याबाबत त्यांचा मुलगा सिध्देश वैभव कडुसकर यांनी मंचर पोलीस ठाण्यात खबर दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार शनिवारी सकाळी सिध्देश कडुसकर हे मंचर येथे असताना त्यांना त्यांच्या आत्याचा मुलगा पवन सुरेश गाडे (रा. साकोरे) यांचा फोन आला. फोनवर पवन गाडे यांनी साकोरे येथील केटी कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यावर वैभव कडुसकर यांची मोटारसायकल उभी असून बाजूला पॅन्ट व चप्पल पडलेली दिसत असल्याची माहिती दिली. तसेच नदीच्या पाण्यात त्यांचा मृतदेह दिसत असल्याचे सांगितले.

# किल्ले शिवनेरीच्या पायथ्याशी असलेली श्री कुलस्वामी सोसायटीचा सहकार मंत्र्यांच्या हस्ते गौरव

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

किल्ले शिवनेरीच्या पायथ्याशी असलेली श्री कुलस्वामी को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी जुन्नर शाखा हिचा जागतिक सहकार वर्षाच्या निमित्ताने आयोजित राज्यस्तरीय सहकार मंथन विचार सहकाराचा विचार विकासाचा हा परिसंवादाचा कार्यक्रमा मध्ये पुणे येथील कॉसमॉस बँकेच्या शाखेत सहकार मंत्री बाबासाहेब पाटील राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले.

अशी माहिती आमदार , श्री कुलस्वामी क्रेडिट सोसायटी संस्थेचे संचालक संतोष चव्हाण यांनी माहिती सांगितली. याप्रसंगी साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य संजय कोलते , ग्रीन वर्ल्ड कॉसमॉस कॉपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष गौतम कोतवाल , अध्यक्ष प्रल्हाद कोकरे प्रमुख उपस्थित होते . श्री कुलस्वामी




को-ऑपरेटिव्ह सोसायटी संस्थेने या कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदवून सहकार क्षेत्रातील हितसंबंधाचे जतन , प्रगती अनुभवाचे आदान - प्रदान व सहकार चळवळीचा भविष्यातील विकास मान या विषयावर दिशादर्शक विचार मांडण्यात मौल्यवान सहकार्य केले . सहकार चळवळीचा भविष्यातील विकास मान या विषयावर दिशादर्शक विचार मांडण्यात मौल्यवान सहकार्य केल्याबद्दल तसेच सहकार तत्वाचा प्रसार व्यावसायिक प्रामाणिकता सामाजिक जबाबदारी आणि जनहित जपणाऱ्या श्री कुलस्वामी सोसायटीचे कार्याची दखल घेत त्यांचा हा गौरव व सन्मान या प्रसंगी करण्यात आला.

याप्रसंगी संस्थेचे सीईओ चंद्रकांत चव्हाण व डीजीएम बाळा चव्हाण उपस्थित होते.

# प्रवास वर्णन लेखन स्पर्धेत उत्तम सदाकाळ यांचा विभागीय स्तरावर प्रथम क्रमांक

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,पुणे यांनी राज्यातील सर्व शिक्षक, अधिकारी यांचेसाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले होते.रमण बाग पुणे येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत अहिल्यानगर, सोलापूर व पुणे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामधून प्रथम क्रमांक मिळविलेल्या स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा करंजाळे,केंद्र-मढ, ता:-जुन्नर या शाळेतील पदवीधर शिक्षक उत्तम निवृत्ती सदाकाळ यांनी "नीलगाईच्या शोधात" हा लेख लिहून 'प्रवास वर्णन लेखन' स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. उत्तम सदाकाळ यांनी या यशामुळे करंजाळे गावाचे, जुन्नर तालुक्याचे व पुणे जिल्ह्याचे नाव उंचावल्याने त्यांचे विविध स्तरातून कौतुक होत आहे.उत्तम सदाकाळ यांनी, विभागीय स्पर्धेतील हे यश गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे,विस्ताराधिकारी विष्णू



धोंडगे,केंद्रप्रमुख मधुकर आढारी, मुख्याध्यापक साहेबराव मांडवे, विषयतज्ञ दीपाली थोरात, सीमा मोरे यांच्या मार्गदर्शनाने व प्रेरणेमुळे प्राप्त झाल्याचे आपले मत व्यक्त केले. महाराष्ट्र शासनाचा राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार,पुणे जिल्हा परिषदेचा गुणवंत शिक्षक पुरस्कार तसेच अनेक राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानीत असणाऱ्या उत्तम सदाकाळ यांची 'पाऊस' कविता इयत्ता दुसरीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट असून त्यांचा 'कमाई' बालकथा संग्रह शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,पुणे यांनी इयत्ता चौथी ते पाचवीच्या मुलांसाठी समग्र शिक्षा तर्फे प्रकाशित केलेला आहे.

# प्रथमच एअरलिफ्टेड लिव्हर ट्रान्सप्लांट आणि ७ दिवसात रुग्णाला डिस्चार्ज

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

उत्तर महाराष्ट्रात प्रथमच, अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे मानवी यकृताची हवाई मार्गाने यशस्वी वाहतूक करून यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. वेळेवर नियोजन आणि अचूक समन्वयामुळे ही ऐतिहासिक कामगिरी शक्य झाली. सांगली ते कोल्हापूर दरम्यान ग्रीन कॉरिडॉर, तर कोल्हापूर ते नाशिक कार्गो एअर अ‍ॅम्ब्युलन्सच्या माध्यमातून अवघ्या दोन तासांत यकृताची सुरक्षित व जलद वाहतूक करण्यात आली. या संपूर्ण प्रक्रियेमुळे एका गंभीर रुग्णाच्या जीवनात नव्याने आशेचा किरण निर्माण झाला.

अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजिस्ट डॉ. संदीप पाटील यांच्या देखरेखीखाली उपचार घेत असलेल्या, यकृत सिरोसिस



व यकृताच्या कर्करोगाने त्रस्त दोंडाईचा, जि. धुळे, येथील ५१ वर्षीय पुरुष रुग्णावर यशस्वी यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात आली. वेळेत करण्यात आलेल्या या शस्त्रक्रियेमुळे रुग्णाला नवीन जीवन मिळाले असून अवघ्या सात दिवसांत त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला.

ही ऐतिहासिक यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया डॉ. शरणकुमार नरुटे आणि त्यांच्या तज्ज्ञ टीमने यशस्वीरीत्या पार पाडली. या संपूर्ण प्रक्रियेचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून, सांगली येथील ब्रेन डेड रुग्णाचे यकृत काढण्याची शस्त्रक्रिया डॉ. अमोल जाधव(ट्रान्सप्लांट सर्जन) यांनी यशस्वीरीत्या पार पाडली, ज्यामुळे पुढील प्रत्यारोपण प्रक्रिया वेळेत शक्य झाली.

या प्रक्रियेत अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे तज्ज्ञ डॉ. संदीप सबनीस (सीनिअर जनरल सर्जन), डॉ. सोहम दोषी (गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजिस्ट), डॉ. अमोल शिंदे (गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजिस्ट) आणि डॉ. संदीप भंगाळे (भूलतज्ञ) यांनी परस्पर समन्वय साधत ही जटिल वैद्यकीय प्रक्रिया यशस्वी केली.

यावेळी प्रतिक्रिया देताना गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजिस्ट डॉ. संदीप पाटील म्हणाले, “यकृत सिरोसिस व यकृताच्या कर्करोगासारख्या गंभीर आजारांमध्ये योग्य वेळी योग्य उपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. अवयवाची वेळेत उपलब्धता, अचूक नियोजन आणि संपूर्ण वैद्यकीय टीममधील उत्कृष्ट समन्वयामुळे हे यश शक्य झाले. अवघ्या सात दिवसांत रुग्ण बरा होऊन घरी परतणे ही आमच्यासाठी अत्यंत समाधानाची बाब आहे.”

तसेच या शस्त्रक्रियेचे नेतृत्व करणारे डॉ. शरणकुमार नरुटे म्हणाले, “एअरलिफ्टेड अवयव वाहतूक आणि त्यानंतरचे यकृत प्रत्यारोपण ही प्रक्रिया वैद्यकीय दृष्ट्या अत्यंत आव्हानात्मक असते. मात्र शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडता आली. उत्तर महाराष्ट्रात अशा उच्चस्तरीय प्रत्यारोपण सुविधा उपलब्ध होणे ही आरोग्यसेवेतील मोठी झेप आहे.”

यावेळी प्रसंगी अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे केंद्र प्रमुख अनुप त्रिपाठी यांनी सांगितले, “ही ऐतिहासिक कामगिरी केवळ नाशिकच्या वैद्यकीय क्षमतेचे दर्शन घडविणारी नाही, तर रुग्ण व त्यांच्या कुटुंबियांच्या मनात नव्याने विश्वास आणि आशा निर्माण करणारी आहे. जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक उपचारपद्धती आता नाशिकमध्येच उपलब्ध असल्याचे हे ठोस उदाहरण आहे.”

# जानेवारी महिन्यात शाळा 10 दिवस बंद राहणार, कारण काय?

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शालेय विद्यार्थ्यांसाठी तसेच त्यांच्या पालकांसाठी एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे. २०२६ चा पहिला महिना अर्थातच जानेवारी महिना विचार करण्यासाठी फारच आनंदाचा राहणार आहे.

२०२५ वर्ष संपत आले असून अवघ्या काही दिवसांत नवीन वर्ष २०२६ चे आगमन होणार आहे. कारण जानेवारी २०२६ महिन्यात शाळांना भरपूर सुट्ट्या मिळणार असल्याने विद्यार्थ्यांची चांगलीच मज्जा होणार आहे. सलग सुट्ट्या, सण-उत्सव आणि वीकेंड यांचा योग आल्यामुळे हा महिना फिरण्यासाठी, कुटुंबासोबत वेळ घालवण्यासाठी आणि अभ्यासासोबतच आराम करण्यासाठी अत्यंत अनुकूल ठरणार आहे.



जानेवारी महिन्यात नववर्ष, मकर संक्रांत, प्रजासत्ताक दिन यांसारख्या महत्त्वाच्या सणांमुळे आणि राष्ट्रीय सुट्ट्यांमुळे शाळा अनेक दिवस बंद राहणार आहेत. याशिवाय शनिवार - रविवारची नेहमीची सुट्टी धरली, तर काही शाळांमध्ये जवळपास १० दिवसांपर्यंत शाळा बंद राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांनाही थोडा निवांत वेळ मिळणार आहे. जानेवारी २०२६ मधील प्रमुख शालेय सुट्ट्यांमध्ये १ जानेवारी रोजी नववर्षाची सुट्टी असेल. २ जानेवारीला नववर्ष आणि मन्नम जयंतीनिमित्त काही राज्यांमध्ये शाळा बंद राहणार आहेत. ३ जानेवारीला हजरत अली यांचा जन्मदिन असल्याने सुट्टी जाहीर होण्याची शक्यता आहे.

१२ जानेवारी रोजी स्वामी विवेकानंद जयंती, १४ जानेवारीला मकर संक्रांत तर १५ जानेवारीला उत्तरायण पुण्यकाल, पोंगल आणि मकर संक्रांत यानिमित्त अनेक राज्यांमध्ये सुट्टी असेल.

१६ जानेवारीला तिरुवल्लुवर दिवस आणि १७ जानेवारीला उझावर थिरुनाल या प्रादेशिक सणांमुळे काही भागांत शाळा बंद राहतील. २३ जानेवारीला नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती आणि २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिन ही राष्ट्रीय सुट्टी असेल. याशिवाय जानेवारी महिन्यातील शनिवार आणि रविवार धरले, तर सुट्ट्यांची संख्या आणखी वाढते.



साकुरी : संतश्रेष्ठ उपासनी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित साकुरी येथील उपासनी महाराज आश्रम मध्ये महाप्रसादाचे वाटप करण्यात आले होते साकुरी येथील कन्या वृंद यांच्या संकल्पनेमधून दरवर्षी या महा प्रसादाचे वाटप करण्यात येते यामध्ये साकुरी गावातील महिलांचा सुद्धा मोठ्या संखेने सहभाग सदरील महाप्रसादाच्या वेळेस नोंदवण्यात येत असतो यावेळी आश्रम मध्ये येणाऱ्या प्रत्येक भक्तास पिठलं भाकरी चा प्रसाद देण्यात येतो सदरील महाप्रसाद हा सकाळी सहा वाजल्यापासून सायंकाळी पाच वाजेपर्यंत सुरु असतो.

## थोडक्यात बातम्या...



### सावेडीत बिशप लॉइड कॉलनीमध्ये ख्रिसमस मेळावा संपन्न

अहिल्यानगर (स. गांवकरी) : सावेडीतल बिशप लॉइड कॉलनीमध्ये योगेश भाऊ सोनवणे पाटील व बिशप लॉईड युथ ग्रुप यांच्या वतीने ख्रिसमस निमित्त मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मोठ्या संख्येने ख्रिश्चन बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते,यावेळी विविध स्पर्धा घेण्यात आले. त्याचे पारितोषिक वितरण योगेश भाऊ सोनवणे पाटील, महांकाळे ताई, रमेश भोसले ,लोंढे ताई, नानी भिंगारदिवे यांच्या हस्ते करण्यात आले. युथ ग्रुपच्या वतीने पूर्ण कॉलनीचा परिसर विद्युत रोषणाई करून चांदण्या लावण्यात आल्या होत्या,योगेश सोनवणे यावेळी बोलताना म्हणाले गेल्यागेल्या ३० वर्षापासून येथे ख्रिसमस उत्साहात साजरा केला जातो व तो आठ दिवस अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने साजरा केला जातो. तसेच मेळाव्यामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमाबरोबर मनोरंजनाचे व स्पर्धा तसेच जेवणाचाही कार्यक्रम अत्यंत शिस्तबद होतात व सर्व स्थानिक नागरिक यामध्ये सहभागी होतात. कार्यक्रम यशस्वी साठी बिशप लॉइड युथ ग्रुपच्या सर्व सदस्य यांनी प्रयत्न केले.

### श्री कुलस्वामी सोसायटीचा सहकार मंत्र्यांच्या हस्ते गौरव

शिवनेरी (स. गांवकरी) : किल्ले शिवनेरीच्या पायथ्याशी असलेली श्री कुलस्वामी को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी जुन्नर शाखा हिचा जागतिक सहकार वर्षाच्या निमित्ताने आयोजित राज्यस्तरीय सहकार मंथन विचार सहकाराचा विचार विकासाचा हा परिसंवादाचा कार्यक्रमा मध्ये पुणे येथील कॉसमॉस बँकेच्या शाखेत सहकार मंत्री बाबासाहेब पाटील राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले . अशी माहिती आमदार , श्री कुलस्वामी क्रेडिट सोसायटी संस्थेचे संचालक संतोष चव्हाण यांनी माहिती सांगितली . याप्रसंगी साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य संजय कोलते , ग्रीन वर्ल्ड कॉसमॉस कॉपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष गौतम कोतवाल , अध्यक्ष प्रल्हाद कोकरे प्रमुख उपस्थित होते . श्री कुलस्वामी को-ऑपरेटिव्ह सोसायटी संस्थेने या कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदवून सहकार क्षेत्रातील हितसंबंधाचे जतन , प्रगती अनुभवाचे आदान - प्रदान व सहकार चळवळीचा भविष्यातील विकास मान या विषयावर दिशादर्शक विचार मांडण्यात मौल्यवान सहकार्य केले . सहकार चळवळीचा भविष्यातील विकास मान या विषयावर दिशादर्शक विचार मांडण्यात मौल्यवान सहकार्य केल्याबद्दल तसेच सहकार तत्वाचा प्रसार व्यावसायिक प्रामाणिकता सामाजिक जबाबदारी आणि जनहित जपणाऱ्या श्री कुलस्वामी सोसायटीचे कार्याची दखल घेत त्यांचा हा गौरव व सन्मान या प्रसंगी करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे सीईओ चंद्रकांत चव्हाण व डीजीएम बाळा चव्हाण उपस्थित होते.



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) : प्रभाग क्रमांक( ७ अ) मधून (सर्व साधारण पुरुष ) विलास माने यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.



ठाणे : दिव्यात शिवसेनेकडून प्रचार व चौक सभांना सुरुवात झाली. प्रसंगी मुंब्रादेवी कॉलनीतील सेंट मेरी शाळेजवळील प्रचार सभेत प्रचंड जनसामुदायाला संबोधित करताना शहरप्रमुख रमाकांत मढवी यांचा झंजावात पहावयास मिळाला. प्रसंगी दिवा शहरातील झालेली विकास कामे व पुढील करण्यात येणाऱ्या विकास कामांचा लेखाजोखा स्पष्ट करण्यात आला. (फोटो - संतोष पडवळ)

# वडगाव आनंद इथे भरली आजी-आजोबांची शाळा

"मनातल्या घालमेलींचा ठाव, अनुभवाच्या उत्तरांना वाव, निर्मळ प्रेमाचं एक गाव आजी आजोबा त्याचं नाव"

**वडगाव आनंद : (समर्थ गांवकरी)**



आजी आजोबांच्या प्रेम व जिव्हाळ्याची आठवण नातवाच्या हृदयात कायम तेजत राहण्यासाठी जि. प. प्रा. शाळा वडगाव आनंद येथे आजी आजोबा पूजन दिनाचे आयोजन करण्यात आले. सुमनफुलांच्या पाकळ्या उधळून नातवांनी टाळ्यांच्या गजरात उपस्थित आजी-आजोबांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक सुनील टिकेकर यांनी केले. शाळा व्यवस्थापन समिती सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते डी बी नाना वाळुंज यांनी आजी-आजोबांचे जीवनातील स्थान विशद केले. उपस्थित आजी-आजोबांनी त्यांच्या शालेय जीवनातील आठवणीना उजाळा दिला. तसेच आजच्या कार्यक्रमाचे विशेष म्हणजे आजी व आजोबांनी आपल्या नातींना व नातवांना लेझीम, टिपर, जात्यावरची गाणी तसेच पाय फुगडी असे जुने खेळ व परंपरा आम्ही यापुढे शनिवारी शाळेत येऊन शिकविण्याची इच्छा व्यक्त केली.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या मनातील आजी आजोबांबद्दलच्या भावना म्हणताना वातावरण अगदीच भावूक झाले. आजी आजोबांचे खरे मित्र आपले नात व नातूच असतात असे प्रतिपादन डी बी नाना वाळुंज यांनी आपल्या प्रास्ताविकात केले. यानंतर आजी-आजोबांचे पूजन करण्यात आले. आजी-आजोबांची संगीत खुर्ची हा खेळ घेण्यात आला. उपस्थित आजी-आजोबांनी लहान होऊन या खेळामध्ये भाग घेतला. या कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षिका छाया डुंबरे, सुनंदा तांबे, गीतांजली बोराडे, सविता खेत्री यांनी परिश्रम घेतले तर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय चौगुले पोलीस पाटील वडगाव आनंद यांचे या उपक्रमासाठी नेहमीप्रमाणेच विशेष सहकार्य लाभले. माजी सनदी अधिकारी तथा आजोबा दत्ताराम वाळूंज यांनी सर्व विद्यार्थ्यांसाठी व आजी आजोबा यांच्यासाठी आईस्क्रीम आणली होती.

# प्रदूषित पाण्याला पिण्यायोग्य बनवणाऱ्या यंत्रणेचे प्रभावी प्रात्यक्षिक

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

सध्याच्या काळात अतिशय गंभीर असलेल्या पाणी आणि हवेचे प्रदूषण या समस्यांवर अद्ययावत तंत्रज्ञानाच्या आधारे शक्य असल्याचे सिद्ध करणारे प्रात्यक्षिक 'इको आईस'च्या वतीने बोट क्लब येथे आज सादर करण्यात आले. यावेळी प्रोजेक्ट ड्रॉपलेट आणि जलशुद्धी या प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. प्रोजेक्ट ड्रॉपलेटद्वारे सौर ऊर्जा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे बोटीचा वापर करून नदी व अन्य जलस्त्रोतांमधील पाण्याची शुद्धता, प्रदूषणाचे प्रमाण आणि अन्य पर्यावरणीय परीक्षण केले जाते. पाण्यातील परिसंस्थेची संबंधित माहिती त्वरित डॅशबोर्डवर उपलब्ध होते. फ्लुईड ऍनालिटिक्सच्या सहकार्याने हा प्रकल्प विकसित करण्यात आला असून वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम कडून सन 2024 चे को प्रोन्युअर ऑफ द इयर हे आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त झाले आहे, अशी माहिती 'इको आईस'चे संस्थापक अध्यक्ष डॉ करण चव्हाण यांनी दिली. यावेळी विद्या प्रतिष्ठान च्या संचालक रजनी इंदुलकर, अतुल चंद्र, श्रुती बापट आदि मान्यवर उपस्थित होते. तसेच पाण्यातील दूषित भाग जाळून टाकून आरओ तंत्रज्ञानाद्वारे त्याला पिण्यायोग्य बनवणाऱ्या जलशुद्धी या यंत्रणेचे सादरीकरणही यावेळी करण्यात आले. ही यंत्रणा घरगुती वापरापासून ते मोठ्या जलसाठ्यापर्यंत पाणी शुद्ध करण्यासाठी वापरता येणे शक्य आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून पाण्याचा पुनर्वापर करणे आणि पाणीटंचाईवर मात करणे शक्य आहे, असा दावा डॉ. चव्हाण यांनी केला.

# उपोषणकर्त्यांना पोलीस प्रशासनाने दिले लेखी पत्र

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

पद्मपुरी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या घोटाळ्याचा मास्टर माईंड माजी नगरसेवक मनोज लक्ष्मण दुलम व इतर साथीदार याचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यास पोलीस प्रशासन हे मोठ्या प्रमाणात टाळाटाळ करीत आहे. त्यावर गुन्हा दाखल व्हावा यासाठी सभासद उपोषनास बसले आहे त्यांची पोलीस प्रशासनाशी चर्चा करून तसे लेखी पत्र दिले आहे. यामध्ये संबंधीत अंबादास चित्याल ,मनोज दुलम, अर्जुन शिंदे ,सौरभ शिंदे, गणेश साळुंखे, मनोज लांडे, देविदास लांडे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी या प्रकरणाची सखोल चौकशी करून त्यामध्ये तथ्य आढळल्यास गुन्हा दाखल करण्यात येईल म्हटले आहे त्यासाठी सोमवारी सकाळी उपोषण कर्त्यांना सर्व कागदपत्रे घेऊन बोलवण्यात आले आहे व यामध्ये घोटाळा झाला असेल तर लगेच गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. यावेळी पोलीस एस. पी. दिलीप टिपरसें , पोलीस निरीक्षक जगदीश भांबल ,ऍड



राजू गाली , अनिता गुंडू आदी उपस्थित होते. पद्मपुरी गृहनिर्माण संस्थेच्या नागरीकांचे निवा-यांचे ठिकाण २२० सभासदांचे प्लॉट बेकायदेशीररित्या विक्री करण्याचा करार करून समाजातील लोकांना बेघर करण्याचा प्रयत्न केलेला आहे.असे सभासदाचे म्हणणे आहे शहराच्या मध्यवर्ती भागातील संस्थेचे सुमारे १ हे. २०आर जागा कवडीमोल भावाने परस्पर विकण्याचा प्रयत्न करून करोडो रुपयांचा घोटाळा करणा-या व समाजातील लोकांना बेघर करणा-या विरुध्द गुन्हा दाखल करणेकामी पद्मपुरी सोसायटी सभासद उपोषणास बसले आहे.

# अनुपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई : आयुक्त

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व नियमबद्ध पार पाडण्यासाठी मतदान केंद्रावर काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी 27 ते 29 डिसेंबर या कालावधीत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणासाठी आदेश प्राप्त होवूनही अनुपस्थित राहिलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करुन फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौरभ राव यांनी नमूद केले.



ठाणे महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी 2013 मतदान केंद्रावर एकूण 10120 कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर करावयाची कामे, ईव्हीएम हाताळणीचे प्रशिक्षण 27 ते 29 डिसेंबर 2025 या कालावधीत दोन सत्रात राम गणेश गडकरी रंगायतन व डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. तीन दिवस असणाऱ्या या प्रशिक्षणास जे अधिकारी कर्मचारी अनुपस्थित राहतील, त्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात येणार आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदान प्रशिक्षण हे निवडणूक कामाचा अत्यावश्यक भाग आहे. प्रशिक्षणाद्वारे मतदान प्रक्रिया, ईव्हीएम हाताळणी, मॉक पोल, मतदार ओळख प्रक्रिया, आचारसंहिता पालन, आपत्कालीन परिस्थितीतील कार्यपद्धती आदी बाबींचे सखोल मार्गदर्शन दिले जाते. त्यामुळे प्रशिक्षणास अनुपस्थित राहणे ही गंभीर बाब मानली जाणार असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

निवडणूक ही लोकशाहीची महत्त्वाची प्रक्रिया असून, त्यात नियुक्त करण्यात आलेल्या प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने जबाबदारीने आपले कर्तव्य पार पाडणे अपेक्षित आहे. कोणतीही सबब ग्राह्य धरली जाणार नाही. सर्व संबंधित कर्मचाऱ्यांनी दिलेल्या वेळेत प्रशिक्षणास उपस्थित राहून निवडणूक कामकाजासाठी सज्ज रहावे, असे आवाहनही प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिवछत्रपती नगर विकास संस्थेने जमिनीवर बेकायदेशीर बांधकाम केल्याचा आरोप

**आळेफाटा : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील आळेफाटा येथील शिवछत्रपती नगर विकास संस्थेने जमीन गट नं. ३५५ मध्ये बेकायदेशीर बांधकाम केल्याचा आरोप राहुल रामदास खोकले यांनी केला आहे. अर्जदाराने उपविभागीय अधिकारी, जुन्नर-आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे) यांच्या न्यायालयात याचिका दाखल केली होती. खोकले यांनी आरोप केला आहे की, संस्थेने जमिनीवर शाळेची इमारत बांधताना जागेवर अतिक्रमण केले आहे. ही इमारत "शिवछत्रपती विद्यालय आळेफाटा" या नावाने ४ थी ते १० वीच्या वर्गासाठी चालवली जात आहे. अर्जदारानी सांगितले की बांधकाम बेकायदेशीर असून त्यामुळे सरकारी जमिनीचे नुकसान होत आहे. उपविभागीय अधिकारी गोविंद शिदे यांनी निकाल पत्रात आदेश दिले आहेत की,सदर बेकायदेशीर बांधकाम असून ते निष्कासित करणे नियमांतर्गत ठरत आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४५ नुसार दंड आकारणी करणेबाबतची कार्यवाही तहसिलदार जुन्नर यांनी करावी. संस्थेने जमिनीवर शाळेची इमारत बांधली आहे. आदेशाची अंमलबजावणी तहसिलदार जुन्नर यांनी करावी व बेकायदेशीर बांधकाम निष्कासित करावे. असे आदेश देण्यात आले आहे. संस्थेने आळेफाटा (वडगाव आनंद) गट नंबर ३५५ मध्ये इमारत बांधकाम करताना मा. जिल्हाधिकारी पुणे तसेच नगर रचना आणि नगर विकास विभाग यांच्याकडून बिनशेती तसेच बांधकाम परवानगी घेतलेली नाही.सदर जमीन मिळकतीवर सध्या अस्तित्वात असलेले इमारती २४ वर्षांपूर्वी बांधलेली आहे.सदर शाळा इमारतीचे बांधकाम बेकायदेशीर आहे या तक्रारदाराच्या म्हणण्यामध्ये तथ्य असल्याचे दिसून आले. संस्थेने इमारतीचे स्ट्रक्चर ऑडिट केल्याबाबत कागदपत्रे चौकशी समिती सादर केलेली नाहीत. शाळेच्या पाठीमागील बाजूस सीमा भिंत संस्थेने अथवा शाळेने बांधलेली नसून सदरची सीमा भिंत सार्वी निसर्ग गृहनिर्माण सोसायटीने बांधलेली आहे. त्याच्याशी संस्था अथवा शाळेचा कोणताही संबंध नाही असे शाळेच्या मुख्याध्यापकांनी लेखी दिले आहे.तसेच पिंपळगाव जोगा धरणाचा कालवा शाळेच्या बाजूने जात असून सदर कालव्याची गळती झालेली आहे. त्यामुळे कालव्याचे पाणी शाळेच्या प्रांगणामध्ये येते सदरची बाब खरी आहे याबाबत अध्यक्ष शिवछत्रपती नगर विकास संस्था आळेफाटा यांनी अभियंता पाटबंधारे विभाग नारायणगाव जुन्नर,पुणे यांना दिनांक १४ डिसेंबर २०२४ रोजी कॅनॉलचे पाणी गळती त्वरित थांबवावी व लवकरात लवकर दुरुस्ती करावी याकरता पत्र व्यवहार केल्याची दिसून येत आहे.

सदर संस्थेने केलेले बांधकाम हे अनधिकृत असून सदर बांधकामामध्ये सन २००० पूर्वी व त्यानंतर कधीही बिनशेती परवानगी नव्हती किंवा बांधकाम परवानगी मिळालेली नाही. सदर बाब अती अत्यंत बेकायदेशीर व गंभीर आहे. सदर संस्थेने बेकायदेशीर बांधकाम करून जमीन मिळकतीचा मूळ उद्देश भंग केला आहे. या बांधकामामुळे शाळेच्या सुरक्षिततेवर परिणाम होत असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेतली गेली नाही. अर्जदाराने आरोप केला आहे की सदर संस्थेने बेकायदेशीर बांधकाम करून नियमानुसार प्रक्रिया पाळली नाही व त्यामुळे संबंधित अधिकारींकडे तक्रार दाखल केली आहे. संस्थेने आजतागायत खाली नमूद गंभीर बेकायदेशीर कृत्ये जाणीवपूर्वक केलेली आहेत व तसेच शासनाच्या कोणत्याही विभागाकडून बिनशेती वापरास परवानगी व बांधकाम परवानगी घेतलेली नाही. अर्जदार यांचे सांगणे कि, प्रस्तुत अर्जदार यांनी प्रस्तुत लेखी युक्तिवादाचा भाग म्हणून महावितरणाला भाग म्हणून महावितरणाला बजावण्यात यावा.

तसेच अर्जदार यांचे म्हणणे आहे कि, प्रस्तुत प्रकरणी न्यायालयाने एफ शिक्षण अधिकारी, पंचायत समिती जुन्नर यांना उपरोक्त पक्षकारांच्या उपस्थितीमध्ये स्थळ पाहणी करून अहवाल सदर करणेस सांगितले होते त्यास अनुसरून शासनाने शिक्षण अधिकारी व पंचायत समिती जुन्नर यांची दि. ९/८/२०२५ रोजी शाळेची पाहणी करून अहवाल सादर केला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## स्मार्ट इंडिया हेकेथॉन २०२५ ग्रँड फिनालेमध्ये डॉ. विखे पाटील अभियांत्रिकीच्या

# विद्यार्थ्यांना प्रथम उपविजेतेपद

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

पंजाब येथील मोहाली मध्ये स्मार्ट इंडिया हेकेथॉन २०२५ च्या सॉफ्टवेअर एडिशनचा ग्रँड चंदिगड अभियांत्रिकी महाविद्यालय, मोहाली या अधिकृत नोडल सेंटरवर उत्साहात पार पडला. देशभरातील अव्वल २५ संघांनी ३६ तासांच्या मॅरेथॉन कोडिंग स्पर्धेत विविध शासकीय विभागांनी दिलेल्या समस्या विधानांसाठी अभिनव सॉफ्टवेअर उपाय विकसित केले.

या प्रतिष्ठित राष्ट्रीय स्पर्धेत अहिल्या नगर येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालया चे सहा विद्यार्थी सुशांत मरकड, अविष्कार भोर, कृष्णकांत त्रिमुखे, ओम पाटील, वैष्णवी धोकटे,स्नेहा पाठक यांनी उल्लेखनीय कामगिरी करत



प्रथम उपविजेतेपद पटकावले. विद्यार्थ्यांच्या अभिनव प्रकल्पाचे तज्ज्ञ परीक्षकांनी कौतुक करत राष्ट्रीय स्तरावर त्यांची दखल घेतली. या विद्यार्थ्यांना प्रा. नितीन पोंधे, प्रा.प्राजक्ता डोलारे, प्रा.आश्विनी देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

महाविद्यालयाच्या पथकाने सादर केलेल्या प्रकल्पाने वास्तव समस्येचे तंत्रज्ञानाधारित समाधान मांडत मौलिकता, तांत्रिक अचूकता आणि सामाजिक उपयुक्तता या सर्वच निकषांवर उत्कृष्ट कामगिरी केली. अंतिम फेरीदरम्यान विद्यार्थ्यांनी सलग ३६ तास मेहनत घेत स्पर्धेत चमक दाखवली.

स्मार्ट इंडिया हेकेथॉन हा भारतातील सर्वात मोठा नवकल्पना स्पर्धात्मक मंच असून, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सरकारी व सामाजिक समस्यांवर उपाय शोधण्याची संधी देतो. मोहाली नोडल सेंटरवर पार पडलेली ही अंतिम फेरी विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला राष्ट्रीय स्तरावर मंच देणारी ठरली. महाविद्यालयाचे प्राचार्य शिक्षकवर्ग तसेच पालकांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे- विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विखे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या शैक्षणिक उंचीमध्ये आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून महाविद्यालयाच्या "विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सतत प्रयत्न या ध्येयवाक्याला आज खऱ्या अर्थाने यश मिळाले आहे.

या यशाबद्दल डॉ.विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ.रविंद्र नवथर, फौंडेशनचे डायरेक्टर टेक्निकल प्रा.श्री. सुनिल कल्हापुरे, डायरेक्टर जनरल डॉ.पी. एम. गायकवाड, फौंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खा.डॉ. सुजय विखे पाटील,जलसंपदा मंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



# महागावात कृषिदूतांचे आगमन

**महागाव (ता.मावळ) : (समर्थ गांवकरी)**

महात्मा फुले कृषी विद्यापीठांतर्गत राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण कृषि कार्यानुभव (RAWE) व कृषी औद्योगिक संलग्नता (AIA) कार्यक्रमाअंतर्गत कृषिदूत म्हणून कार्यरत असलेले विद्यार्थ्यांचे पथक महागाव गावात दाखल झाले आहे. या कार्यक्रमाअंतर्गत कृषिदूतांकडून शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, पीक व्यवस्थापन, मृदा आरोग्य, कीड-रोग नियंत्रण, शाश्वत शेती तसेच कृषी विषयक विविध बाबींवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कृषी विद्यापीठातील शैक्षणिक ज्ञानाचा प्रत्यक्ष शेतीत उपयोग करून शेतकऱ्यांपर्यंत नवे प्रयोग पोहोचविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. महागाव ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने कृषिदूतांचे स्वागत करण्यात आले. यावेळी सरपंच इंद्रजीत पडवळ, उपसरपंच यमुना मरगळे, ग्रामपंचायत अधिकारी एल. एस. सावळे तसेच इतर ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. या उपक्रमात कृषिदूत म्हणून सौरभ घरदाळे, रितेश जाधव, सुरज मुजावर, वैष्णव महाजन, अजय बाराते, प्रतिक करंजखेले व साहिल वाघमारे सहभागी झाले असून आगामी कालावधीत गावात शेतभेटी, मार्गदर्शन सत्रे व जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

# बिबट्याच्या हल्ल्यात शेतकऱ्याच्या तीन शेळ्या ठार

- वासुंदे येथे घडली घटना; वनविभागाकडून पंचनामा

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील वासुंदे गावातील जेडगुले वस्तीच्या पूर्वेकडील शेतात शुक्रवारी २६ डिसेंबर २०२५ दुपारी एक वाजता बिबट्याने शेतकरी अंकुश बगाजी साठे यांच्या तीन शेळ्यांवर हल्ला करून त्या ठार केल्या. ही घटना घडल्यानंतर परिसरातील शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे.

पारनेर तालुक्यात गेल्या काही महिन्यांत बिबट्याच्या हल्ल्यांच्या घटना वाढल्या आहेत. यापूर्वी डिसेंबर महिन्यातच किन्ही गावात ६५ वर्षीय महिलेवर बिबट्याने हल्ला करून तिचा मृत्यू झाला होता. त्यामुळे शेतकरी रात्री-दिवस शेतात काम करताना सतर्क राहण्याची वेळ



आली आहे. बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे जनावरे व मानवी जीव धोक्यात आले आहेत.

या ताज्या घटनेनंतर वनविभागाने तात्काळ घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. मात्र, तालुक्यात सतत घडणाऱ्या अशा घटनांमुळे वनविभाग व प्रशासन तत्पर भूमिका घेण्यास कमी पडत असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. ग्रामस्थांनी बिबट्या पकडण्यासाठी अधिक पिंजरे लावणे व रेस्क्यू टीम तैनात करण्याची मागणी केली आहे.

वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, परिसरात बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवले जात आहे व लवकरच उपाययोजना केल्या जातील. तरीही शेतकऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना कायम आहे.

> वासुंदे, जेडगुले वस्ती आणि आजूबाजूच्या परिसरात तात्काळ बिबट्या पकडण्यासाठी पुरेसे पिंजरे लावावेत. तसेच रेस्क्यू टीम स्थायी स्वरूपात तैनात करावी. जर वनविभागाने याकडे दुर्लक्ष केले तर आम्हाला रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करावे लागेल. शेतकरी आणि जनावरांच्या जीवाची काळजी घेणे ही वनविभागाची जबाबदारी आहे, ती पार पाडली जावी.
>
> **- भाऊ सैद, (ग्रामस्थ, वासुंदे)**

# जि.प.प्राथमिक शाळा वडगाव आनंद शाळेची गरुडझेप

**वडगाव आनंद : (समर्थ गांवकरी)**

शतकोत्तर वाटचाल करणाऱ्या वडगाव आनंद येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने स्वानंदी शिक्षण संगणक शिक्षण, कराटे, योगा, विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र डायनिंग हॉल, पिण्याच्या पाण्यासाठी अल्कलाइन वॉटर फिल्टर, विद्यार्थ्यांची दप्तरे ठेवण्यासाठी स्वतंत्र लॉकर्स, औषधी वनस्पती व फुले तसेच फळझाडांनी समृद्ध व नटलेली शाळा. संगणक, वाचनालय, चित्रकला अशा विषयांसाठी स्वतंत्र शिक्षकाची नेमणूक अशा अनेक उपक्रमांद्वारे जिल्हासमोर नव्हे तर राज्यसमोर एक वेगळा आदर्श ठेवला आहे आणि यामुळेच इयत्ता पहिली मध्ये प्रवेश मिळावा यासाठी वेटींग मध्ये असणारी अशी शाळा.

# मूलभूत सुविधा व सार्वजनिक विकास कामांना गती

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील बोरीवली ग्रामपंचायत हद्दीत नागरिकांच्या मूलभूत गरजा लक्षात घेऊन विविध विकासकामे सुरू करण्यात आली आहेत. ग्रामपंचायतीच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या या कामांमुळे परिसरातील नागरी सुविधा सुधारण्यास मदत होत असून नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. बोरीवली ग्रामपंचायत हद्दीतील विविध ठिकाणी रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येत असून काही भागांत नवीन रस्ते बांधकामाचे काम सुरू आहे. समतानगर, बोरीवली नवी वस्ती या भागांत जुन्या व मोडकळीस आलेल्या गटारांची दुरुस्ती तसेच नवीन गटार बांधकामाचे काम प्रगतीपथावर आहे. या कामांमुळे पावसाळ्यात होणाऱ्या पाणी साचण्याच्या



समस्येला आळा बसण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने बोरिवली गावातील विविध ठिकाणी नवीन बोरवेल खोदण्याचे काम सुरू असून, त्यामुळे भविष्यात पिण्याच्या पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होणार असल्याचे ग्रामस्थांचे मत आहे. तसेच आनंदनगर येथील जिल्हा परिषद मराठी शाळेसाठी संरक्षण भिंत बांधण्याचे काम सुरू करण्यात आले असून, त्यामुळे शाळेतील विद्यार्थी आणि शालेय परिसराची सुरक्षितता वाढणार आहे. क्रीडा क्षेत्राला चालना देण्यासाठी बोरीवली फुटबॉल मैदानावर खेळाडूंसाठी प्लेअर्स पॅव्हिलियन उभारण्यात आले आहे. या सुविधेमुळे ग्रामपंचायत हद्दीतील खेळाडूंना सराव व स्पर्धांच्या वेळी अधिक सोयी उपलब्ध होणार आहेत. याचबरोबर समतानगर, बोरीवली येथे नागरिकांसाठी विश्रांती बेंचेस बसविण्यात आल्या आहेत. स्वच्छता व प्रकाश व्यवस्थेच्या दृष्टीने ग्रामपंचायत हद्दीतील विविध भागांत नियमित स्वच्छता मोहीम राबविण्यात येत असून, अनेक ठिकाणी नवीन पथदिवे बसविण्यात आले आहेत. यामुळे रात्रीच्या वेळी सुरक्षितता वाढण्यास मदत होत आहे. सदर विकासकामे बोरीवली ग्रामपंचायतीचे सरपंच अनवर पिंजारी व ग्रामपंचायत अधिकारी गणेश जाधव व ग्रामपंचायत कमिटी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, बोरीवलीतील सामाजिक कार्यकर्ते ॲड .जियाद सोहराब गुजर यांच्या प्रयत्नाने विविध विकास कामांना गती मिळत आहे. गावातील विविध समस्या सोडविण्यासाठी बोरीवली ग्रामपंचायत पुढाकार घेत असून, येत्या काळात आणखी विकासकामे राबविण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे.

# कोरठण खंडोबाला हळद लागली : यात्रोत्सवाची उत्साहात सुरुवात

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील पिंपळगाव रोठा येथील श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थानाच्या वार्षिक यात्रोत्सवाला उत्साहात सुरुवात झाली. शुक्रवारी २६ डिसेंबर रोजी खंडोबा देवाला पारंपरिक पद्धतीने हळद महिलांच्या हस्ते लावण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या राणीताई लंके, कोरठण खंडोबा देवस्थानच्या अध्यक्षा शालिनीताई घुले, राष्ट्रवादीच्या नेत्या तेजस्विनीताई उगले, सरपंच सुरेखा वाळुंज, यांच्यासह पिंपळगाव रोठा व परिसरातील मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. हळद लावण्याच्या विधीनंतर भक्तांनी मुक्तहस्ते भंडारा उधळला, ज्यामुळे परिसर पिवळा झाला आणि मल्हारी पिवळा झाला, हळद लागली असे भक्तिगीत घुमले. यावेळी माजी सरपंच अशोक घुले, संतोष वाळुंज, सुरेश



ढोमे, राष्ट्रवादी युवक उपाध्यक्ष सौरभ क्षीरसागर, श्रीरंग घुले, भाऊसाहेब गाडगे, बाळासाहेब घुले, ईस्माई हवालदार, माजी उपसरपंच बाळासाहेब पुंडे, चेअरमन गंगाराम कोळेकर, सरपंच बापू ठुबे, दत्तात्रय क्षिरसागर, गोपीनाथ घुले, विलास येवले, दत्तात्रय खोडदे, विकास खोडदे यांच्यासह अनेक मानकरी व ग्रामस्थ उपस्थित होते. खंडोबा हे लाखो भक्तांचे कुलदैवत असून, हळद अर्पण ही विजय व शुभतेची प्रथा आहे. उत्सवात पालख्या व महापूजा होणार असल्याने भाविकांची गर्दी वाढत आहे.

दि. 26 डिसेंबर 2025 ते दि. 2 जानेवारी 2026 या दरम्यान कोरठण गडावर ह भ प कविराज महाराज झावरे ह भ प प्रकाश महाराज साठे ह भ प उमेश महाराज दशरथे ह भ प शिवानंद महाराज शास्त्री ह भ प भागवताचार्य समाधान महाराज भोजेकर ह भ प सागर महाराज बोराटे ह भ प अक्रूर महाराज साखरे यांची कीर्तन सेवा होणार आहे दिनांक 2 जानेवारी रोजी समाधान महाराज शर्मा यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. यावेळी गडावर विविध धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ३ जानेवारी ते ५ जानेवारी या दरम्यान यात्रोत्सव होणार आहे. देवस्थान कमिटी व प्रशासनाच्या वतीने योग्य नियोजन करण्यात आले आहे. या भक्तीमय सोहळ्याला देवाला हळद लावून झाली आहे.

# तायक्वांदो स्पर्धा उत्साहात संपन्न

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

जामखेड च्या जगदंबा मंगल कार्यालयात जिल्हास्तरीय सब ज्युनिअर तायक्वांदो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाभरातून 150 खेळाडूंनी सहभाग घेतला. या स्पर्धेतील विजेते खेळाडू सिंधुदुर्ग येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. अशी माहिती अहिल्यानगर जिल्हा तायक्वांदो संघटनेचे सचिव संतोष बारगजे यांनी दिली. तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडिया अंतर्गत तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र मुंबई संघटनेच्या मान्यतेने सिंधुदुर्ग येथे ते 27 व 28 डिसेंबरला 35 व्या महाराष्ट्र राज्य सब ज्युनिअर तायक्वांदो स्पर्धा होणार आहे. या अनुषंगाने अहिल्यानगर जिल्हा तायक्वांदो संघटनेच्या वतीने जगदंबा मंगल कार्यालय खर्डा रोड जामखेड येथे रविवारी अहिल्यानगर जिल्हा सबज्युनियर तायक्वांदो स्पर्धा 2025 चे आयोजन करण्यात आले.

# रावेर–पाल रस्ता दयनीय अवस्थेत

## आदिवासी २४ गावांचा जीव धोक्यात!





> आदिवासी बांधवांचे दैनंदिन जीवन, शिक्षण व पर्यटन यांवर गंभीर परिणाम होत असल्याने वरिष्ठांनी तातडीने लक्ष घालून रावेर–पाल रस्ता दुरुस्त करावा व आदिवासी जनतेला न्याय द्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे.
>
> **— चंद्रकांत कोळी, रावेर**

**रावेर : (समर्थ गांवकरी)**

रावेर तालुक्यातील अति दुर्गम आदिवासी भागातील २४ गावांना जोडणारा सुमारे २४ किलोमीटर लांबीचा रावेर–पाल रस्ता सध्या अत्यंत दयनीय अवस्थेत आहे. या रस्त्यावरून वाहन चालवताना चालकांना तारेवरची कसरत करावी लागत असून, जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. खड्डे एवढे वाढले आहेत की “रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता?” असा प्रश्न वाहनचालकांना पडतो.

या रस्त्यावरून अनेक शासकीय अधिकारी, राजकीय तसेच सामाजिक कार्यकर्ते ये-जा करतात. मात्र इतकी खराब स्थिती असूनही ती त्यांच्या नजरेत कशी काय पडत नाही, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.

रावेर–पाल रस्त्याला अनेक गावे जोडलेली असून तांड्यावरील, वाड्यावरील, वस्तीवरील आदिवासी बांधवांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः लालमातीच्या भागात रस्त्याची अवस्था अधिकच बिकट झाली आहे. परिणामी शालेय विद्यार्थ्यांना शाळेत जाणेही कठीण झाले आहे.

दरम्यान, महाराष्ट्र शासनाने विकसित केलेल्या जंगल सफारी प्रकल्पासाठी रावेर येथून येणाऱ्या पर्यटकांना हाच रस्ता वापरावा लागतो. मात्र खराब रस्त्यामुळे या भागातील पर्यटकांची संख्या घटत असल्याचे जाणकार सांगतात.

# वडगाव शेरीत शिवसेना शिंदे जागा द्यावी : उध्दव गलांडे



**पुणे/वडगाव शेरी : (समर्थ गांवकरी)**

वडगाव शेरी प्रभाग पाच मध्ये शिवसेनेने अनेक वर्ष प्रतिनिधित्व केले आहे. या प्रभागात शिवसेना (शिंदे गटाची) ताकद आहे. यामुळे या प्रभागात किमान दोन जागा शिवसेना शिंदे गटासाठी द्याव्यात अशी मागणी शिवसेना उपशहर संघटक उध्दव गलांडे यांनी पत्रकार परिषदेत केली. पुणे महापालिका निवडणुकीसाठी भाजप– शिवसेना युती असली, तरी जागावाटपात शिवसेना शिंदे गटाला कमी जागा दिल्या जाणार असल्याच्या चर्चांमुळे पक्षात अस्वस्थता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर वडगाव शेरी मधील शिवसैनिक (शिंदे गट)शिवसेना पुणे शहर उपशहर संघटक उद्धव गलांडे यांच्या संपर्क कार्यालयात आज आयोजित पत्रकार परिषदेत ही मागणी मांडण्यात आली. या पत्रकार परिषदेला छाया रविंद्र गलांडे, रमेश साळुंके, चेतन गलांडे, शाहरुख कुरेशी, विपुल दळवी, विकास गायकवाड आदी मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# सावरगाव काळेवाडी येथे बुधवारपासून पंचदिनी कीर्तन महोत्सव

## श्री स्वामी समर्थ अनंत मठात धार्मिक कार्यक्रम : सेवेकरी संतोष गायखे यांची माहिती





**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

श्रीक्षेत्र काळेवाडी सावरगाव येथील श्री स्वामी समर्थ अनंत मठात पंचमदिनी कीर्तन महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव बुधवार, ३१ डिसेंबर २०२५ ते रविवार, ४ जानेवारी २०२६ या कालावधीत होणार असून, ह भ प डॉ. नारायण महाराज जाधव (डॉक्टर बाबा) आळंदी देवाची यांच्या मार्गदर्शनाखाली व अनंत मठाच्या प्रेरणास्थान गुरु माऊली सुनिता पोतदार काकी यांच्या आशीर्वादाने आणि परमपूज्य सद्गुरु अनंत पोतदार काका यांच्या पुण्यतिथी निमित्ताने साजरा होत आहे.

या महोत्सवात प्रसिद्ध कीर्तनकारांची सेवा होणार आहे. ह.भ.प. तृप्तीताई शिर्के महाराज, ह.भ.प. सुमित महाराज झावरे, ह.भ.प. अशोक महाराज शिंदे आणि ह.भ.प. बाबासाहेब महाराज वाणी यांचे कीर्तन होईल. विशेष म्हणजे, रविवार, ४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. दत्तात्रय महाराज भोर संगमनेर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. या उत्सवात ह.भ.प. तृप्ती ताई शिर्के महाराज आळंदी देवाची गुरु लीलामृत ग्रंथ पारायणाचे नेतृत्व करणार आहेत.

धार्मिक कार्यक्रमांची रूपरेषा अशी आहे: पहाटे ५ वाजता काकड आरती, सकाळी ७ वाजता ग्रंथ पूजन, विना पूजन आणि प्रतिमा पूजन, सकाळी ८ ते ११ गुरु लीलामृत ग्रंथ पारायण, सायंकाळी हरिपाठ आणि त्यानंतर नैवेद्य आरती, रात्री ७ ते ९ कीर्तन, नंतर महाप्रसाद आणि भजनी मंडळाचा जागर. हे सर्व कार्यक्रम भक्तिमय वातावरणात साजरे होतील.

या महोत्सवाला डॉ. अभिजीत पंडित, रेवनाथ चिकणे आणि म्हातारबा गायखे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

कार्यक्रमाचे नियोजन अनंत मठातील सर्व स्वामी सेवेकरी महिला व पुरुष तसेच काळेवाडीतील ग्रामस्थांनी केले आहे. विशेष सहकार्य काळेवाडी, लांडगेवाडी आणि सावरगाव परिसरातील समस्त ग्रामस्थांचे असणार आहे.

> श्री स्वामी समर्थ अनंत मठातील पंचदिनी कीर्तन महोत्सव सद्गुरु अनंत पोतदार काका यांच्या पुण्यतिथी निमित्त साजरा होत आहे. गुरुमाऊली सुनिता पोतदार काकींच्या आशीर्वादाने व प्रसिद्ध कीर्तनकारांच्या सेवेने हा उत्सव भक्तिमय होईल. सर्व ग्रामस्थांच्या सहकार्याने आयोजन यशस्वी होत आहे. हा महोत्सव सद्गुरुंच्या स्मृतीत आणि भक्तीच्या प्रसारासाठी आहे. सर्व भक्तांना या उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन आहे. हा महोत्सव परिसरातील धार्मिक एकात्मतेचे प्रतीक ठरेल, असा विश्वास आहे.
>
> **- उद्योजक संतोष गायखे, (सेवेकरी श्री स्वामी समर्थ अनंतमठ, काळेवाडी)**

# निवडणूक कामात शिक्षकच का?

'एक देश एक निवडणूक' या संकल्पनेचा कितीही गाजावाजा झाला तरी देशाच्या कानाकोपऱ्यात कोणत्या ना कोणत्या निवडणुका सतत होतच असतात. अगदी ग्रामपंचायतींपासून ते लोकसभेपर्यंत हा निवडणुकांचा धडाका राजकीय पक्षांचे नेते व कार्यकर्त्यांना सतत गुंतवून ठेवतो. त्यामुळे आदर्श कल्पना म्हणून देशभरात एकाचवेळी सगळ्या निवडणुका घेण्याच्या कितीही घोषणा झाल्या तरी हा सुविचार कधी प्रत्यक्षात अनुभवता येईल, अशी काही चिन्हे नाहीत. किंबहुना त्या घोषणा करणाऱ्यांना तरी खरेच मनातून तशी इच्छा आहे की नाही ही शंका यावी, अशी एकंदर परिस्थिती आहे. मागील वर्षी सहा महिन्यांच्या अंतराने लोकसभा व विधानसभा निवडणूक पार पडली. त्यानंतर काही ग्रामपंचायतींची निवडणूक झाली आणि आता गेली नऊ-दहा वर्षे रखडलेल्या नगरपालिका-नगरपंचायती, महापालिका व जिल्हा परिषद, पंचायत समित्या अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. यातल्या नगरपालिका-नगरपंचायतींच्या निवडणुकांचा धुरळा खाली बसण्याआधी महापालिका निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. नव्या वर्षाच्या पहिल्या महिन्याच्या मध्यात या निवडणुकीचे निकाल लागेपर्यंत पंचायत समित्या व जिल्हा परिषद निवडणुकीचा रणसंग्राम सुरू झालेला असेल. कारण, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ३१ जानेवारीच्या आत या सगळ्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगाला आटोपायच्या आहेत. असो. हा सगळा गदारोळ आता विचारात घेण्याचे कारण म्हणजे निवडणुकांचे हे अवजड व अवघड धनुष्य पेलणारी प्रशासकीय यंत्रणा. एकतर केंद्रीय तसेच राज्य निवडणूक आयोगाकडे स्वत:चे कोणतेही मनुष्यबळ नाही. मतदारयाद्या तयार करण्यापासून ते त्या वेळोवेळी अद्ययावत करण्यापर्यंत, अगदी त्यातील दुरुस्तीसाठीचीही सगळी कामे महसूल यंत्रणेला करावी लागतात. ती यंत्रणा कमी पडली की जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्ह्या-जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी जिल्हा परिषद व इतर यंत्रणांमधून हवे ते व हवे तेवढे कर्मचारी अधिग्रहित करतात.

## संपादकीय





प्रत्यक्ष निवडणूक पार पाडणे हे अत्यंत जोखमीचे घटनादत्त काम असल्यामुळे त्यासाठी प्रामुख्याने शिक्षकांवर जबाबदारी टाकली जाते. शासकीय व गैरशासकीय शाळांची संख्या मोठी, त्यातील शिक्षकांचीही संख्या मोठी आणि निवडणूक पार पाडण्यासाठी लागणाऱ्या सुशिक्षित मनुष्यबळाची गरजही मोठी, यामुळे गरज किंवा मागणी व पुरवठा ही दोन्ही सूत्रे लक्षात घेऊन सगळ्या निवडणुकांचे ओझे शिक्षकांच्या खांद्यावर येऊन पडते. त्याबद्दल नाराजी व्यक्त करण्याची किंवा ते काम नाकारण्याची सोय नसते. कारण, निवडणूक आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करताना निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना जास्तीचे अधिकार प्राप्त झालेले असतात. जनगणनेसह वेगवेगळ्या प्रकारची मोजणी, शिरगणती किंवा या निवडणुका अशा नानाविध गैरशैक्षणिक कामांचा बोजा शिक्षकांना असह्य झाल्याच्या आणि परिणामी शैक्षणिक कामांकडे दुर्लक्ष होत असल्याच्या कितीही तक्रारी झाल्या तरी त्याकडे ना शासन लक्ष देत, ना समाज त्यांची दखल घेतो.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ६६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 4 | 2 | | | |
| 4 | 1 | | | | 6 | 7 | | 3 |
| | | 6 | | | 5 | | 1 | |
| | 9 | | | | 3 | 2 | | 7 |
| 7 | 4 | | | 1 | | | 9 | 6 |
| 5 | | 8 | 9 | | | | 3 | |
| | 5 | | 6 | | | 3 | | |
| 1 | | 7 | 5 | | | | 4 | 2 |
| | | | 7 | 2 | 1 | | | |

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ६५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 4 | 7 | 2 | 9 | 3 | 5 | 6 | 1 |
| 2 | 6 | 9 | 7 | 1 | 5 | 8 | 4 | 3 |
| 1 | 3 | 5 | 6 | 4 | 8 | 7 | 9 | 2 |
| 4 | 1 | 6 | 5 | 3 | 7 | 2 | 8 | 9 |
| 9 | 7 | 8 | 1 | 6 | 2 | 4 | 3 | 5 |
| 3 | 5 | 2 | 9 | 8 | 4 | 1 | 7 | 6 |
| 6 | 9 | 4 | 8 | 2 | 1 | 3 | 5 | 7 |
| 7 | 2 | 3 | 4 | 5 | 9 | 6 | 1 | 8 |
| 5 | 8 | 1 | 3 | 7 | 6 | 9 | 2 | 4 |

उत्तर उद्याच्या अंकात

पंचांग
२८डिसेंबर२०२५
रविवार
विक्रम संवत्- २०८२
पौष शके संवत्- १९४७
संवत्सर – विश्वावसूनाम

अयन- उत्तरायणारंभ
मास- पौष
ऋतु- सौर हेमंत
शुक्ल पक्ष
तिथि:अष्टमी ११:५९:४८
नक्षत्र:उत्तराभाद्रपद

०८:४३:०९
योग:वारीयन १०:१३:०५
करण:बव ११:५९:४८
करण:बालव २३:१०:४५
सूर्य:धनु
चन्द्र:मीन

## उपदेशाचे डोस

### कष्टाची बरी भाजी-भाकरी

प्राचीन अरबस्थानात हातिम बिन ताई नावाचा धनिक, कनवाळू, दानशूर आणि परम नीतिमंत म्हणून प्रसिद्ध होता. हातिमताई या नावानेच तो ओळखला जातो. एकदा एका मित्राने म्हटले, 'मला तर अलम दुनियेत तुझ्या तोडीची श्रेष्ठ व्यक्ती दुजी असेल, असं वाटत नाही. तुला तरी असा कुणी भेटला होत का,जो तुला तुझ्याहून श्रेष्ठ वाटला?'

हातिमताईंनी म्हटले,'एकदा मी पवित्र पर्वणीच्या दिवशी अन्नछत्र उघडलं. चाळीस उंट दान केले. कुणाही अतिथीला मुक्तद्वार होतं. माझे आप्तेष्ट नगरीत हिंडून हाकारा-डांगोरा पिटत होते. मी स्वतःसुद्धा भुकेलेल्यांच्या शोधासाठी बाहेर पडलो. वेशीबाहेर मला एक लाकूडतोड्या भेटला. ताज्या छाटलेल्या काटक्यांची मोळी त्याच्या माथ्यावर होती. मी त्याला म्हटलं, भाई हातिमताईच्या अन्नछत्रात जाऊन तू यथेच्छ भोजन का करत नाहीस?' त्यानं उत्तर दिलं, 'निढळाचा घाम गाळून जो आपली भाकरी कमावू शकतो, त्याला हातिमताईच्या औदार्यानं ओशाळं व्हायची जरुरीच काय? 'मी यावर निरुत्तर झालो. तो लाकूडतोड्या नक्कीच माझ्याहून वरचढ होता.

कथा उपदेश : आशाळभूत होण्यापेक्षा, लाचारी पत्करण्यापेक्षा स्वश्रमाने मिळालेली भाकरी पंचपक्वान्नांहून स्वादिष्ट असते. मनुजाने स्वत्वावर तिलांजली देऊ नये. पृथ्वीचे राज्य त्याचेच आहे!

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९०३- मोटरचालकांसाठी परवानापद्धत सुरू इंगलंडचे अनुकरण लवकरच इतर देशांत सुरू.
- १९३७- दक्षिण आयर्लंड आयर या नावाने स्वतंत्र प्रजासत्ताक देश बनला.

### राष्ट्रीय

- १६८८- संगमेश्वर मुक्कामी औरंगाजेबाच्या सैनिकांनी संभाजी महाराजांना पकडले.
- २००१- सुनील दत्त, रामकृष्ण हेगडे, पांडूरंशास्त्री आठवले व इस्रोचे अध्यक्ष के. कस्तुरीरंगन यांचा सरस्वती सम्मानाने गौरविण्यात आले.


### जन्म

- १८९४- सुपर फॉस्फेटचा निर्माता जॉन लोवेजचा जन्म. याच्या शोधामुळे कृत्रिम खतांचा जमाना सुरू झाला.
- १८५६- अमेरिकेचे अध्यक्ष वुड्रो विल्सन यांचा जन्म.
- १९३२- धीरजलाल हिराचंद अंबानी (धीरुभाई अंबानी) यांचा जन्म.
- १९७३- हायड्रोजनचे हेलियममध्ये कसे रूपांतर होते, हे शोधून काढणाऱ्या विल्यम हार्कीन्सचा जन्म.
- १८९९- पत्रकार, संपादक, साहित्यिक ग. त्र्यं. णाडखोलकर यांचा जन्म.

### निधन

- १६९४- दुसऱ्या मेरीचे निधन.
- १९२३- गुस्तावह आयफ `लचे निधन.
- १९७७- प्रख्यात हिंदी साहित्यिक सुमित्रानंदन पंत यांचे निधन.
- २००७ – आंध्र प्रदेशातील काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार पी. जनार्दन रेड्डी यांचे हृदयविकाराने निधन.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ६६



**आडवे शब्द**

१. दृष्टीभेट
२. योग्य उपयोग
८. पूजाअर्चेचे काम करणारा
१०. नड
११. सापाचे-इंगळीचे चावणे
१३. अखबार
१६. समशेर
१८. साठ मिनिटे
१९. डोळ्यावर आलेली झोपेची गुंगी
२०. पोपट
२२. कौसल्यापुत्र
२४. ठाण्याचा रहिवासी
२६. वर्तमानपत्रातील कप्पा
२८. माफी
२९. संगीतातील एक राग
३१. सहाय्य
३२. प्रतीक
३५. सर्वस्व
३८. गेरू
३९. समशीतोष्ण
४०. हत्तींच्या कळपाचा प्रमुख
४२. थरथरणारा आवाज
४३. एकूण एक, सर्व
४४. वालुकामय जमीन
४६. दुर्लक्ष
४८. पक्षाघात
५०. घरातील मोठी मंडळी
५२. परमेश्वर
५४. अंत:करणपूर्वक
५५. विरोध
५७. प्रार्थना, उपासना
५९. विजयाची घोषणा
६२. शाहीराजवळचे चर्मवाद्य
६३. पद्धत
६४. दहाचा संच
६६. एक संत
६८. प्रसिद्धीपत्रक
७०. अस्सल, निर्भेळ
७१. स्त्री
७२. आवाज, गोंगाट
७३. सापाने टाकलेली त्वचा
७४. स्वयंपाकाचे शास्त्र
७६. गार, थंड
७७. शेजारी शेजारी

**उभे शब्द**

१. नावात पैसा असून अत्यंत गरीब
२. सोन्याचा धागा
३. शासन कालावधी, कारकीर्द
४. दात
५. सगळीकडे
६. पुन्हा पुन्हा
७. लोटी
८. विद्येचे माहेरघर
९. पद्धतीप्रमाणे
१२. कापसाचे बी
१४. लडबडणे, चोपडणे
१५. वेतन
१७. मुलगा (हिंदी)
२१. रक्षण करणारा
२३. माझे
२५. क्रूर मनुष्य
२७. साप
३०. मान खाली घातलेला
३१. हाताचा एम भाग
३३. झकास
३४. घाबरलेला, व्याकूळ
३६. अभिनेता
३७. प्रत्येक दिवशी
३८. फळाची पातळ फोड
३९. नाजूक
४१. जुन्या काळचे दंतमंजन
४२. मृत्यू, यम, वेळ
४५. नमनीय
४६. आश्रय, थारा, टेकू
४७. लहान
४९. श्रीविष्णूचे बटुरुप
५०. वर्तुळ
५१. मनाची इच्छा, तरंग
५३. जुगार खेळणारा (हिंदी)
५४. 'मी – हरपून बसले गं' (कवि : सुरेश भट)
५६. थेट, सरळ
५८. रात्रभर
६०. जन्मापासून
६१. बांगड्यांचा व्यवसाय करणारा
६४. एक श्वासरोग
६५. लाडीगोडी, चलाखी
६७. आईची बहीण
६९. द्वाड, हट्टी, खोडकर
७०. चौपट
७३. आजच्या आधीचा दिवस
७४. चतकोर
७५. वेदना, खटका

**शब्दकोडे क्र. ६५ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.साक्षरता अभियान ६.गीता रहस्य ९.रेती १०.रन ११.माता १२.कार १४.मकान १५.कमान १६.अनाकलनीय १८.मवाळ २०.सअ २२.सजीव २४.पर २५.नकार २७.वहेदा २९.भगदा ३१.धसका ३३.मावळा ३४.नल दमयंती ३६.निदान ३७.वर ३८.मीन ४०.नालायक ४२.रसरशीत ४४.तरतुद ४७.वारा ४८.भाल ५०.मर ५१.सुखकर्ता दुखहर्ता ५६.राजकुमार ५८.रवाना ५९.चातक ६०.पसा ६२.सकाम ६४.गडकरी ६५.गतकालीन ६९.दमणीय ७१.सम ७३.मवाळ ७४.वासलात ७५.वहाड ७७.विनर ७८.नीट ८०.नस ८१.कानन ८३.कपाट ८४.परसदार ८५.निरवता

उभे शब्द : १.सारेगामपधनी २.क्षती ३.तारका ४.अननस ५.याचक ६.गीता ७.रकाना ८.हरकत ११.मानस १३.राणी १४.मळ १६.अवहेलना १७.यशोदा १९.वारसदार २१.अनवरत २३.जीवन २६.काळा २८.दादला २९.भयंकर ३०.गती ३२.कानस ३३. मावशी ३५.मयत ३९.नखरा ४१.गदर ४३.रजर्ता ४५.तुम ४६.असुर ४७.वार्ता ४८.भाजक ४९.लकु ५२.खवा ५३.कना ५४.दुख ५५.हलका ५६.रातराणी ५७.माकडहाड ६०.परीस ६१.कली ६३.मदतनीस ६५.गम ६६.तवा ६७.काळवीट ६८.नवार ७०.यवन ७२.महानता ७६.-हास ७९.टदा ८१.कार ८२.नव

# संदल उत्सवात येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासनाच्या सुचनेचे पालन करा - चंद्रकांत जाधव

- सलग चार दिवस चालणाऱ्या उर्स मोहोत्सवा निमित्त पूर्वतयारी म्हणून पोलीस प्रशासन सज्ज



**कंधार : (समर्थ गांवकरी)**

ऐतिहासिक कंधार शहराला साधु संताची भुमी म्हणून ओळखले जाते सर्वधर्मसमभावाचे प्रतीक म्हणून सर्वदूर ओळखले जाणारे शहरात हिंदू आणि मुस्लिम ऐक्याचे प्रतीक मानली जाणारी ७०० वर्षांपूर्वीचा इतिहास असलेल्या 'हजरत हजी सय्याह सरवरे मगदुम रहे यांचा उर्स मोहोत्सवाची सुरुवात चंद्र दर्शना नंतर झाली आहे.त्या अनुषंगाने पोलीस प्रशासनही सज्ज झाले आहे. पूर्वतयारी म्हणून दि २५ डिसेंबर २०२५ रोजी कंधार पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांनी संदल निमित्त येणाऱ्या भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी सुरक्षेतेच्या दृष्टिकोनातून पहाणी करून उपाययोजना म्हणून काही सुचना करून येणाऱ्या भक्त भाविकांनी गैरसोय होऊ नये यासाठी दर्गाह व पोलिस प्रशासनाच्या सुचनेचे पालन करुन सहकार्य करावे असे आवाहन पोलिस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांनी भाविकांना केले आहे.या वेळी मुतवल्ली मुजतबा मोहीयोद्दीन,

दर्गाह कमिटीचे अध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक जफरोद्दीन बाहोद्दीन अदी उपस्थित होते . कंधार येथील प्रसिद्ध सुफी संत हजरत हाजिसंय्या सरवरे मगदुम रहे यांच ७११ वा उर्स मोहोत्सव दि.६ जानेवारी २०२६ पासून सुरू असणार आहे.सलग चार ते पाच दिवस चालणाऱ्या या संताच्या उर्सात राज्यासह, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, या सह अनेक राज्यातून मोठ्या संख्येने श्रध्दालु संदलसाठी येत असतात.या यात्रेत येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी पूर्वतयारी म्हणून कंधारचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांनी मुतवल्ली मुजतबा मोहीयोद्दीन व दर्गाह कमेटीचे अध्यक्ष जफरोद्दिन बाहोद्दिन यांना सोबत घेऊन सुरक्षिततेच्या संदर्भात चर्चा करून योग्य ते उपाययोजना करण्याचे सुचना केली आहे. सध्या कडाक्याची थंडीचे दिवस सुरू असल्याने भाविकांनी स्वतःची काळजी घ्यावी व येणाऱ्या भक्त भाविकांनी सुरक्षेतच्या अनुषंगाने स्वतःची गैरसोय टाळण्यासाठी पोलीस प्रशासन व दर्गाह कमिटीच्या सूचनेचे पालन करून पोलीस प्रशासनाला मदत करावे असे आवाहन चंद्रकांत जाधव यांनी भाविकांना केले आहे.

यावेळी गुप्तचर विभागाचे डि आर गिरे,बिट जमादार दिपक डिकळे,मेजर सानप,मुराद मोलीसाब ,ॲड हाजी परवेझउल्लाह,मोहम्मद जफर,आरेफखांन,आसेफ पटेल,अदी उपस्थित होते.



# अवैध गोवंश वाहतुकी करणाऱ्या दोन पिकअप जप्त

- मनाठा पोलिसांची धडक कारवाई
- १३ लाख २० हजारचा मुद्देमाल जप्त

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

अवैध गोवंश वाहतुकी करणाऱ्या दोन पिकअप सह आठ गोवंश मुद्देमाल जप्त. मनाठा पोलिसांची धडक कारवाई. मनाठा पोलीस ठाण्याचा हद्दीत हदगांव वारंगा मार्गे दिनांक २५ रोजी १४. २० ला गुप्त माहितीच्या आधारे अवैध गोवंश वाहतूक करणाऱ्या दोन पिकअप क्र. MH29VE7384,MH28VV1282 मध्ये क्रूरते न ८ गोवंस ढाबवून वाहतुक करणाऱ्यावर छापा मारून आरोपी इनामूल हसन मो. इकबाल रा. मुळावा ता उमरखेड,रमेश चंद्रवंशी रा. सुकळी ता. उमरखेड, शे. नझिम शे. खलील रा. देवसरी ता. जिंतूर, शिवाजी सोनवणे रा. ओंढा, देवराव पोटे रा. ओंढा या आरोपी ला अटक करून मनाठा पोलीस ठाण्यात गुनाह दाखल करण्यात आलं @दोन पिकअप अंदाजे किंमत १०लाख रुपये ८गोवंस अंदाजे ३लाख २०हजार रुपये असं एकूण १३लाख २०हजार रुपये किंमत मुद्दे माल सहित जप्त करून कारवाई करण्यात आली या कारवाई साठी मनाठा पोलीस ठाण्याचे सपोनि विलास चवळी,पोहेकॉ रेणुकाप्रसाद, रावळे, अशोक दाढे, पोको शाम खानपट्टे, सोनटक्के, अतुल नागरगोजे यांनी उत्तम कामगिरी बद्दल पोलीस अधीक्षक अभिनव कुमार अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, उपविभागीय पोलीस अधीक्षक डी एस हाके यांनी पोलीस टीम चं कौतुक केलं.

# संघ राज्यस्तरीय लोकगीत स्पर्धेसाठी रवाना



**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे आयोजित जिल्हा क्रिडा कार्यालय, नांदेडच्या वतीने जिल्हा युवा महोत्सव संपन्न झाला. या महोत्सवात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या ललित व प्रयोगजीवी कला संकुलाच्या संगीत विभागाचा लोकगीत समूह,चित्रकला, काव्यवाचन इ. कला प्रकारांचा समावेश होता. लोकगीत (समूह) या कला प्रकारात विद्यापीठाच्या संघाने विभागीय युवा महोत्सवात अस्सल मराठमोळे पारंपरिक लोकगीत सादर करून सुवर्णपदक प्राप्त करत पूणे येथे दि.२९ ते ३१ डिसेंबर, २०२५ दरम्यान संपन्न होणाऱ्या राज्यस्तरीय युवक महोत्सवासाठी संघ रवाना झाला.

या यशस्वी विद्यार्थ्यामध्ये प्रशांत चित्ते, तुषार वडने, मीनाक्षी आडे,प्रियंका कोल्हे, सोनू गवळी ,पल्लवी डोईबळे, श्रीनिवास लंकावाड, महेश शिंदे, समाधान राऊत, गणेश इंगोले, आदिती केंद्रे, संजय भराडे या विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

या विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. शिवराज शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले होते. विभागीय स्तरावर मिळालेल्या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ.डी. डी. पवार, अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर, ललित व प्रयोगजीवी कला संकुलाचे संचालक प्रा.डॉ.पृथ्वीराज तौर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम,संगीत विभागातील प्रा. नामदेव बोंपिलवार, प्रा.किरण सावंत, यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि राज्यस्तरीय युवा महोत्सवा साठी शुभेच्छा दिल्या.



# स्वाधीन गाडेकर यांचा सत्कार

**राहता : (समर्थ गांवकरी)**

नुकत्याच झालेल्या राहता नगर परिषदेच्या निवडणुकीत युवा शिलेदार डॉ स्वाधीन गाडेकर हे मोठ्या मताधिक्याने निवडून आले त्यांच्या याच विजयाबद्दल साकुरी ग्रामस्थ यांच्या वतीने डॉ स्वाधीन गाडेकर यांचा सत्कार करण्यात आला यावेळी साकुरी उपासनी कन्याकुमारी आश्रम च्या ट्रस्टी माधवी ताई गुरु गोदावरी यांच्या हस्ते डॉ गाडेकर यांचे औक्षण करण्यात आले.

# अवैध रेती उपसा करणाऱ्या रेती माफियावर कारवाई

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या गंगाबेट नदीच्या गोदावरी नदी पात्रात अवैध रित्या वाळू उपसा होत असल्याच्या गोपनीय माहिती आधारे साठवलेली पाच ब्रास रेती,एक इंजिन,आठ तराफे जाळुन नष्ट केले असून एकुण ७ लाख २५ हजार रुपये मुद्देमाल जप्त करून तिन जणांविरुद्ध ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड व पथकाने कार्यवाही केली.



ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत अवैधरित्या गोण खनिज (रेती) उपसा व वाहतुक करणारे लोकांवर कारवाई करणे वाचत सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी यांना आदेशीत केले आहे.त्या अनुषंगाने ओमकांत चिंचोलकर पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण यांचे आदेशान्वये

पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड, पोहेकॉ अर्जुन मुंडे, पोका शेख समीर, पोकों सिरमलवार, सर्व नेमणुक पो.स्टे. नांदेड ग्रामीण अधिकारी व अंमलदार यांनी गोदावरी नदीपात्रात चोरुन लपुन अवैध रेती उपसा होत आहे, अशी माहीतीवरुन योग्य तो सापळा लावून दिनांक २६ डिसेंबर रोजी सांयकाळी १५.३० वाजता गंगाबेट गोदावरी नदी पात्रातुन अवैध रेती उपसा करणारे इसमावर छापा कार्यवाही करूण एक इंजीन व आठ तराफे जागीच नाश करूण, उपसा करून किना-यावर साठवलेली ०५ ब्रास रेती जप्त केली असुन रामचंद्र वानखेडे संदीप वानखेडे रा.मौ.गंगाबेट ता.जि.नांदेड व इतर अज्ञात एक वरील नमुद आरोपीता विरोधात कलम ३०३( २), ३( ५) भा.न्या.सं, सहकलम ४८( ७), ४८( ८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम ९, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम व कलम ३, ७ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या कामगीरीचे अविनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी अभिनंदन केले आहे.

# आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा सन्मान

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**




नांदेड येथील साई - सुभाष, वसंतनगर, नांदेड येथील निवासस्थानी भेट घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे माजी खासदार तथा लोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर व सौ.प्रतिभाताई प्रतापराव पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस प्रविण पाटील चिखलीकर, सचिन पाटील चिखलीकर यांचा लोहा नगर परिषदेचे नगर अध्यक्ष व सर्व नगरसेवक व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सत्कार सन्मान करण्यात आला आहे.

यावेळी लोहा नगर परिषदेचे नगर अध्यक्ष शरद पवार . माणिकराव मुकदम, माजी नगराध्यक्ष किरण सावकार वट्टमवार, लोहा पंचायत समितीचे माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे ढाकणीकर, डॉक्टर संजय गुंडावार, काकाजीराव पवार, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती बालाजी पाटील मारतळेकर, माजी उपसभापती बळीराम पाटील कदम, शंकर ढगे, साईनाथ पाटील कपाळे, केशवराव मुकादम, नगरसेवक केशवराव मुकदम, नगरसेवक करीम शेख, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, नगरसेवक अविनाश कदम, नगरसेवक मारुती जंगले, नगरसेवक भास्कर पवार, नगरसेवक तुकाराम दाढेल, नगरसेवक पंकज परिहार, नगरसेवक गणेश बगाटे, नगरसेवक इरबा पवार, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, दिलीप पाटील कारेगावकर, दत्ता शेट्टे, बालाजीराव पांडागळे, भानुदास पाटील पवार, अनिल धुतमल, बाळू पाटील पवार यांच्यासह आदींची उपस्थिती होती.



# चांगदेव निकम यांचे निधन

**वडाळा महादेव : (समर्थ गांवकरी)**

श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील अध्यात्मिक क्षेत्रातील चांगदेव भिकाजी निकम यांचे वृद्धापकाळाने निधन झाले आहे मृत्यू समयी त्यांचे [ ८९ ] वर्षे वय होते त्यांच्या पश्चात पत्नी - मुले तीन मुलगी एक सुना नातवंडे जावई पुतणे असा मोठा परिवार आहे येथील सामाजिक कार्यकर्ते श्री तुकाराम निकम विलास निकम राजेंद्र निकम यांचे ते वडील तर इंजी - प्रवीण निकम विशाल यश प्रफुल्ल विपुल यांचे ते आजोबा होत.

# मोत्याची किंमत शिंपल्यातून बाहेर आल्यावरच ठरते

- सौ. अनुराधाताई नागवडे : नागवडे इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये 'आनंदी बाजार' उत्साहात संपन्न

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासोबत नफा–तोट्याचे गणित, व्यवसायातील व्यवहारिक ज्ञान मिळावे या उद्देशाने श्रीगोंदा येथील नागवडे इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये 'आनंदी बाजार' चे आयोजन करण्यात आले. या उपक्रमास पालक व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. फळे, भाजीपाला, स्टेशनरी, खेळणी व खाद्यपदार्थांचे सुमारे २४० छोटे-मोठे स्टॉल उभारण्यात आले असून एकूण ३ लाख ८२ हजार ८६७ रुपयांची उलाढाल नोंदवण्यात आली.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना सौ. अनुराधाताई नागवडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कोणताही व्यवसाय करताना प्रभावी मार्केटिंग महत्त्वाचे असून, बाजारातील दैनंदिन बदलांशी अपडेट राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. "मोत्याची किंमत शिंपल्यातून बाहेर आल्यावरच ठरते; तसेच परिस्थितीशी हार न मानता सामना केल्यास यश निश्चित मिळते," असा जीवनमूल्यांचा संदेश त्यांनी दिला.

केंद्रप्रमुख श्री. माणिक आढाव यांनी विद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता उच्च दर्जाची असल्याचे नमूद करत शालेय प्रशासनाच्या सर्वांगीण प्रयत्नांचे कौतुक केले. यावेळी नाताळ सणाची आख्यायिका व देखावा सादर करण्यात आला.

# भारतीय अन्नसेवा क्षेत्राला संरचनात्मक दिलासा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

केंद्रीय अर्थसंकल्प जवळ येत असताना, भारतातील अन्नसेवा उद्योग रोजगारनिर्मिती, उपभोग आणि औपचारिक अर्थव्यवस्थेतील योगदानाच्या दृष्टीने वाढत्या महत्त्वामुळे सरकारकडून धोरणात्मक पाठबळ मिळेल, अशी सावध आशा व्यक्त करत आहे. सध्या या बाजाराचे मूल्य सुमारे ५.७ लाख कोटी रुपये असून, आर्थिक वर्ष २०२८ पर्यंत ते सुमारे ७.७६ लाख कोटी रुपये होण्याची अपेक्षा आहे. या काळात उद्योगाचा वार्षिक संमिश्र वाढ दर (CAGR) ८–९ टक्के राहील असा अंदाज आहे. हा उद्योग भारताच्या जीडीपीमध्ये सुमारे २ टक्के योगदान देतो आणि ८.५ दशलक्षांहून अधिक लोकांना रोजगार उपलब्ध करून देतो, ज्यामुळे हा भारतातील सर्वात मोठ्या बिगर-कृषी रोजगार देणाऱ्या क्षेत्रांपैकी एक ठरतो. मोठ्या कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांना जेवण पुरवण्याचे काम या क्षेत्रातील कंपन्या करतात. रसेन्स प्रायव्हेट लिमिटेडचे सीईओ आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय कुमार म्हणाले "भारतीय अन्नसेवा क्षेत्र हे देशातील अर्ध-कुशल कामगारांसाठी सर्वात मोठ्या रोजगार देणाऱ्या क्षेत्रांपैकी एक असल्याने, त्याच्या वाढीसाठी आणि विकासासाठी व्यापक धोरणात्मक सुधारणा अत्यावश्यक आहेत. मात्र, ITC अडथळे ते बहुस्तरीय मंजुरी प्रक्रिया अशा कडक नियमांमुळे लवचिकतेला फारसा वाव नाही." आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाकडून आम्हाला मोठ्या अपेक्षा आहेत आणि वित्त मंत्रालयाने या क्षेत्रातील अडचणींवर उपाययोजना जाहीर कराव्यात, अशी आशा आहे.



# ग्रामीण भागातील रस्ते विकासाचे केंद्रबिंदू : विमल झावरे

## वासुंदे येथे ठुबे वस्ती ते मांडवा रोड रस्त्याचे भूमिपूजन संपन्न

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

> हा रस्ता वासुंदे गावाच्या प्रगतीचा महत्त्वाचा टप्पा आहे. अनेक वर्षांची ग्रामस्थांची मागणी पूर्ण होत आहे. सुजित झावरे पाटील यांचे आभार. हे काम जलद पूर्ण होईल, असा विश्वास आहे. रहदारी सुधारल्याने शेतकरी व ग्रामस्थांना मोठा फायदा होईल. **- पै. गणेश शिरतार (लाखेवस्ती, वासुंदे)**

ग्रामीण भागातील रस्ते हे खऱ्या अर्थाने गावच्या विकासाचे केंद्रबिंदू असतात सुजितराव झावरे पाटील यांच्या माध्यमातून तालुक्यातील आज अनेक रस्त्यांचे प्रश्न मार्गी लागत आहेत वासुंदे येथील विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा व गेल्या अनेक वर्षापासून ग्रामस्थांची मागणी असलेल्या रस्त्याचे भूमिपूजन झाल्याने रहदारीची मोठी सोय होईल आणि शेतीमालाची ने-आण सुलभ होईल. सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन झाल्याबद्दल त्यांचे आभार. हे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी अपेक्षा आहे असे मत सरपंच विमल झावरे यांनी व्यक्त केले. ग्रामपंचायत वासुंदे अंतर्गत येणाऱ्या ठुबे वस्ती ते मांडवा रोड या महत्त्वाच्या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन समारंभ नुकताच संपन्न झाला. हा समारंभ जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांच्या शुभहस्ते पार पडला या रस्त्याचे सुशोभीकरण झाल्यास परिसरातील रहदारीला मोठा दिलासा मिळणार असून, ग्रामस्थांच्या दळणवळणाची सोय सुधारेल. कार्यक्रमाला ग्रामपंचायत सदस्य, विविध सोसायटींचे संचालक, मान्यवर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सरपंच विमल झावरे, उपसरपंच बाळासाहेब शिंदे, माजी उपसरपंच शंकर बर्वे, चेअरमन सूर्यभान भालेकर, स्वप्रिल झावरे, दिलीपराव पाटोळे, विलास साठे, बाळासाहेब झावरे, पो. मा. झावरे, भाऊ सैद, लहानुभाऊ झावरे, लक्ष्मण झावरे, मारुती उगले गुरुजी, उद्योजक संदीप दाते, इंजि. प्रसाद झावरे, इंजि. निकील दाते, पै. गणेश शिरतार, शांताराम शिंदे, गणेश झावरे, संग्राम झावरे, विठ्ठल शिरतार, कोंडीभाऊ शिरतार, तुळशीराम जेडगुले, विठ्ठल जेडगुले, पै. कुलदीप शिरतार, संदीप खंडाळे, मंगेश झावरे, शुभम झावरे, निलेश झावरे, दत्तात्रय बर्वे, रामदास शिरतार, विशाल शिरतार, मयूर शिरतार, दत्तात्रय शिरतार, कृष्णा सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

ग्रामस्थांनी या विकासकामाचे स्वागत करीत, लवकरात लवकर काम पूर्ण होण्याची अपेक्षा व्यक्त केली.

# चिखली येथे माजी विद्यार्थी संघाची स्थापना



**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

दिनांक २७ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिखली, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर येथे माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. शासन निर्णयानुसार प्रत्येक शाळेत माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम पार पडला.

१९०६ साली स्थापन झालेली जीवन शिक्षण मंडळ अर्थात आजची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिखली या शाळेचा गौरवशाली इतिहास असून, या मेळाव्यास माजी विद्यार्थ्यांसह पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. अनेक वर्षांनंतर बालपणीचे दिवस, शाळेचे मैदान, खेळ व मित्रमैत्रिणी पुन्हा एकत्र येण्याचा हा क्षण उपस्थितांसाठी भावनिक ठरला. संत तुकाराम महाराजांच्या लहानपण देगा देवा या ओळींचा प्रत्यय देणारा हा सोहळा ठरला. कोया, सूरपारंब्या, पोहणे, कुस्ती, क्रिकेट, कबड्डी, सागरगोटे अशा विविध खेळांच्या आठवणींना उजाळा देत बालपणाचा आनंद सर्वांनी अनुभवला.

या प्रसंगी माजी विद्यार्थी संघाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. अध्यक्ष राजेंद्र पाटील झेंडे, उपाध्यक्ष संजय पाटील लंके, कोषाध्यक्ष गोरख पाटील लंके सदस्य अभय कार्ले, विजयसिंह झेंडे, केशव झेंडे, दत्तात्रय झेंडे, सुजय झेंडे, बाळासाहेब कचरू लंके, छाया टाकवणे/कार्ले कार्यक्रमाचे प्रमुख अध्यक्षस्थान अशोक कार्ले यांनी भूषवले. गावचे विद्यमान सरपंच कुलदीप कदम पाटील यांनी मनोगत व्यक्त करत शाळेच्या भरीव विकासासाठी सदैव सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य अभय कार्ले यांनी शाळेच्या विकासात्मक बाबींवर मोजक्या शब्दांत मार्गदर्शन केले. यावेळी केशवराव झेंडे, राजेंद्र झेंडे, संजय लंके, दत्तात्रय झेंडे, बाळासाहेब लंके (पोलीस पाटील) यांनीही मनोगत व्यक्त केले.

माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष राजेंद्र झेंडे यांनी शाळेच्या उर्वरित कंपाउंडसाठी तारजाळी देण्याची घोषणा केली. तसेच शाळेच्या आवश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी माजी विद्यार्थी सदैव पाठीशी राहतील, अशी एकमुखी भूमिका मांडण्यात आली. छाया टाकवणे/कार्ले यांनी शाळेच्या ग्रंथालयासाठी आवश्यक साहित्य व पुस्तके देण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष विजयसिंह पाटील, अभय कार्ले, सुजय झेंडे, केशव झेंडे, राजेंद्र गाडेकर, किशोर लंके, शंकर झेंडे, सतीश सकट, जनार्दन भदार्गे, सहदेव झेंडे, सुरेश झेंडे, संतोष लंके, बाळासाहेब गाडेकर, दिलीप लंके, बाप्पू दत्तात्रय झेंडे, अंबादास कार्ले, फक्कड दिनकर झेंडे, संतोष झेंडे, दीपक झेंडे सादिक तांबोळी तसेच महिला वर्गातून वृषाली दादा गायकवाड, सारिका सुनिल झेंडे, रिता संतोष लंके उपस्थित होत्या.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक लोंढे सोमनाथ यांनी विशेष परिश्रम घेतले. उपमुख्याध्यापिका ज्योती पवार यांनी बदलत्या शिक्षण पद्धतींवर मार्गदर्शन केले. चौरे रविराज यांनी उपस्थितांचे स्वागत करून अध्यक्षांच्या परवानगीने आभार मानले. माजी विद्यार्थी संघाच्या स्थापनेमुळे शाळेच्या शैक्षणिक व भौतिक विकासाला निश्चितच नवी दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# विज्ञान जगताचा डोलारा गणितावरच अवलंबून : प्रा. मिलींद देशपांडे

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



पेमराज सारडा महाविद्यालयाच्या गणित विभागातर्फे नुकताच 'राष्ट्रीय गणित दिवस' साजरा करण्यात आला. थोर भारतीय गणिततज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन जयंतीनिमित्त हा दिवस साजरा केला जातो. या प्रसंगी बोलताना महाविद्यालयाचे उपप्राचाय प्रा. मिलींद देशपांडे यांनी विज्ञानाचे मूळ गणितात कसे आहे हे विद्यार्थ्यांना सांगितले. राईट बंधूच्या विमानाच्या संशोधनात बर्नालींच्या डिफरन्शिअल इक्वेशन्सचा कशा पद्धतीने उपयोग झाला हे सांगितले. व्हॉटस्ॲपवर येणाऱ्या साईन कॉस संदर्भातील विनोदांचा उल्लेख करत त्यांनी विद्यार्थ्यांना त्याचे इलेक्ट्रॉन्सच्या परिवलनातील महत्त्व समजावून सांगितले. संगणक शास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. राजेश पाटणी यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज साधताना संगणकशास्त्रासाठी गणिताची गरज समजावून सांगितली. भौतिकशास्त्र, संगणकशास्त्र व इलेक्ट्रॉनिक्स या सर्वच विषयांच्या प्रगतीसाठी गणिताची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना अभ्यासाला पर्याय नसल्याचे सांगून अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट केले. या कार्यक्रमात विद्यार्थिनी सर्वश्री भूमी कुलकर्णी, अनुष्का मुदगंटी, प्रणाली पांडे, साक्षी पांडे, अंकिता भुक्कन यांनी श्रीनिवास रामानुजन यांच्या आयुष्यावर आणि त्यांच्या कार्याबद्दल माहिती सांगितली. कृष्णा मुळे या विद्यार्थाने याप्रसंगी एक पीपीटी सादर केली. या कार्यक्रमाच्या द्वितीय सत्रात रामानुजन यांच्यावरील चित्रपट 'द मॅन हू न्यू इन्फिनिटी' विद्यार्थ्यांना दाखविला. या चित्रपटातून भारताची तत्कालीन सामाजिक, राजकीय परिस्थती आणि शिक्षणव्यवस्थेचे चित्रण केलेले असल्याने विद्यार्थ्यांना बऱ्याच नव्या गोष्टी समजल्या. ज्या गणितज्ज्ञांच्या सिद्धांतांचा अभ्यास क्रमिक अभ्यासक्रमातून ते करतात त्यांच्या व्यक्तिरेखा पहावयास मिळाल्या.

# त्रस्त मुलांसाठी वेळेवर होणारे ट्रान्सप्लांट कसे बदलू शकते

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

जन्मजात यकृत आजाराने त्रस्त मुलांमध्ये वारंवार काविळ, फिक्कट किंवा राखाडी रंगाची विष्ठा, पोटाचा आकार असामान्यपणे वाढणे किंवा वजन योग्यरित्या न वाढणे अशी लक्षणे दिसून येतात. या रोगांचे सर्वात सामान्य कारण 'बिलियरी एट्रेसिया' (Biliary Atresia) हे असते, ज्यामध्ये पित्त बाहेर वाहून नेणाऱ्या नलिका एकतर विकसित होत नाहीत किंवा बंद होतात. याशिवाय पित्त प्रवाहाशी संबंधित इतर समस्या आणि काही जेनेटिक मेटाबॉलिक लिव्हर डिसीजेस देखील यासाठी जबाबदार असू शकतात, ज्यामध्ये एन्झाईम्सच्या कमतरतेमुळे यकृताचे गंभीर नुकसान होते.



हे आजार केवळ मुलाच्या शारीरिक वाढीत अडथळा आणत नाहीत, तर त्यांच्या मानसिक विकासावरही विपरीत परिणाम करतात. त्यामुळे अशा मुलांना तात्काळ आणि विशेष पीडियाट्रिक लिव्हर केअरची आवश्यकता असते. योग्य वेळी तज्ज्ञांकडून उपचार मिळाल्यास मुले केवळ आजारातून सावरत नाहीत, तर आपल्या वयाच्या इतर मुलांप्रमाणे आवश्यक 'ग्रोथ माईलस्टोन्स' देखील गाठू शकतात. नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मुंबई येथील इन्स्टिट्यूट ऑफ लिव्हर, इंटेस्टाईन अँड पॅनक्रियास सायन्सेसमधील पीडियाट्रिक हेपेटोलॉजीचे असोसिएट डायरेक्टर, डॉ. ललित वर्मा यांनी सांगितले: "जन्मजात लिव्हरचा आजार मुलाच्या वाढीवर अनेक स्तरांवर परिणाम करतो. जेव्हा पित्त प्रवाह (Cholestasis) विस्कळीत होतो, तेव्हा आतडे चरबी (Fat) आणि चरबीमध्ये विरघळणारी जीवनसत्त्वे—जसे की A, D, E आणि K—योग्यरित्या शोषू शकत नाहीत. यामुळे वजन वाढण्यास अडचण, उंची खुंटणे आणि हाडे कमकुवत होणे यांसारख्या समस्या उद्भवतात. पोटात द्रव (Fluid) साठल्यामुळे आणि प्लीहा (Spleen) वाढल्यामुळे मुलाला सतत जडपणा जाणवतो. सतत खाज सुटणे आणि थकवा यामुळे त्यांची झोप आणि खेळण्यावरही परिणाम होतो, ज्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास थांबतो. याव्यतिरिक्त, ग्रस्त यकृत शरीरातील विषारी घटक (Toxins) बाहेर टाकू शकत नाही, ज्यामुळे मेंदूच्या विकासावर परिणाम होतो आणि बसणे, चालणे यांसारख्या मोटर स्किल्ससह बोलण्याच्या क्षमतेतही विलंब होऊ शकतो."

# श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या गौरवपूर्ती सोहळ्यानिमित्त मंचर येथे भव्य श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ आध्यात्मिक सोहळा गुरुवार दि.१ ते बुधवार दि.७ या कालावधीत कृषी उत्पन्न बाजार समिती, मंचर येथे पार पडणार आहे.अशी माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती निलेश थोरात यांनी दिली. ज्ञानयज्ञात गुरुवर्य श्रीकृष्ण कृपांकित डॉ. विकासानंदजी महाराज मिसाळ हे आपल्या अमृतमय वाणीतून श्रीमद् भागवतकथेचे निरूपण करणार आहेत. दररोज रात्री ९ नंतर उपस्थित भाविकांसाठी अन्नप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कथासोहळ्यास श्रीमद् आद्य जगद्गुरु शंकराचार्य श्री वारकरी परिवार, श्री संत पंढरी पिंपळगाव वाघा यांची साथसंगत लाभणार आहे.

# 'सूर्यदत्त'च्या वार्षिक संमेलनात 'ऑपरेशन सिंदूर'ची संकल्पना

## डॉ. संजय बी. चोरडियांचे प्रभावी मार्गदर्शन; विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाचे कौतुक

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



सूर्यदत्त नॅशनल स्कूलतर्फे वार्षिक स्नेहसंमेलन 'नवरस्य: व्हेअर इमोशन्स स्पीक' मोठ्या उत्साहात झाले. 'सूर्यदत्त'च्या बावधन कॅम्पसमधील बन्सीरत्न सभागृहात आयोजित स्नेहसंमेलनात भारतीय संस्कृतीतील शृंगार, हास्य, करुणा, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स, अद्भुत आणि शांत या नवरस भावनांवर विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्य, संगीत, दृश्यकथन अशा विविध कलाप्रकारांद्वारे मानवी भावविश्वाची प्रभावी आणि हृदयाला भिडणारी अभिव्यक्ती साकारली. 'ऑपरेशन सिंदूर' या देशभक्तीपर भावनेने भारलेल्या व 'वीर' रस दर्शविणाऱ्या या प्रस्तुतीने प्रेक्षकांच्या डोळ्यांत पाणी आणत, सैनिकांच्या शौर्य, त्याग आणि धैर्याला मनोभावे अभिवादन केले. इयत्ता ३ री ते ९ वीच्या विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्य, संगीत, दृश्य सादरीकरण इत्यादी माध्यमांतून प्रत्येक रसाचे रंगमंचावर प्रभावी दर्शन घडविले. विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध आणि उत्कृष्ट सादरीकरणाने उपस्थित पालक व मान्यवरांची दाद मिळाली. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या या सादरीकरणाचे कौतुक केले.

सुरुवातीला शृंगार रसातील 'मोहे रंग दो लाल' आणि 'काहे करे शृंगार' यांसारख्या कलाकृतींतून प्रेम आणि सौंदर्याची पवित्र अनुभूती रंगमंचावर साकारली.

पुढच्या टप्प्यात हास्य रसाचा शिरकाव झाला आणि खुसखुशीत विनोद व हलक्याफुलक्या कार्यक्रमातून उपस्थितांमध्ये हास्यलहरी व उत्साह संचारला. 'धुरंधर टेररिस्ट थीम' मधून पहलगाम दहशतवादी हल्ल्याचे भयानक वास्तव विद्यार्थ्यांनी मांडले. 'भरें नैना' मधून करुण रस जागृत झाला.

प्रिय व्यक्तीच्या निधनाचे दुःख आणि अश्रूंनी भरलेली संवेदना मनाला भिडली. या वेदनेतून प्रकट झालेल्या संतापाचे रूप 'आरंभ है प्रचंड' आणि 'रक्त चरित्र' च्या सादरीकरणांतून रौद्र रसात उमलले.

# 'आर्या ओम्निटॉक' तर्फे 'आर्यावन' हा कृषी-वनशेतीचा उपक्रम सुरू

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



सुरक्षा, गतिशीलता आणि संज्ञापन यासंबंधीच्या उपायाधारित सेवा पुरविण्यात अग्रगण्य असलेल्या आर्या ओम्निटॉक कंपनीने आज 'आर्यावन' या आपल्या सीएसआर उपक्रमाचा प्रारंभ केला. पर्यावरणीय पुनरुज्जीवन आणि ग्रामीण समुदायांचे सशक्तीकरण यांना समर्पित असलेला हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. या प्रकल्पात एक लाख झाडांची लागवड करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांसाठी दीर्घकालीन उपजीविकेच्या संधी निर्माण करणे, तसेच पर्यावरणीय समतोल आणि जैवविविधतेचे संवर्धन साध्य करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली संकल्पित केलेला 'आर्यावन' हा उपक्रम एका साध्या, पण प्रभावी विचारावर आधारलेला आहे. तंत्रज्ञानाचे खरे आणि सर्वोच्च उद्दिष्ट तेव्हाच साध्य होते, जेव्हा ते ज्या समाजामुळे टिकून आहे त्या समाजाला काहीतरी परत देऊ शकते, हा तो विचार होय. पुनरुत्पादक, दीर्घकाळ टिकणारे आणि जीवनदायी असे काहीतरी निर्माण करणे, या अर्थाने 'वन' हा शब्दच या उपक्रमाचा गाभा दर्शवतो. 'आर्यावन' अंतर्गत वृक्षलागवड, शाश्वत शेती पद्धती, पर्यावरण संवर्धन आणि उपजीविका विकास यांवर विशेष भर देण्यात येणार असून, शेतकऱ्यांसाठी नव्या संधी निर्माण करण्याला प्राधान्य दिले जाणार आहे. नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिक सुरक्षित आणि अधिक जोडलेल्या समुदायांची उभारणी करण्याच्या दीर्घकालीन कटिबद्धतेतून 'आर्या ओम्निटॉक' ला 'आर्यावन' साठीची प्रेरणा मिळाली आहे. गेल्या काही वर्षांत कंपनीने हेही ओळखले की, प्रगती ही पर्यावरणाच्या हानीच्या मोबदल्यात होऊ नये, ही आपली अधिक खोल जबाबदारी आहे. त्या दृष्टीने तंत्रज्ञानातील प्रगती आणि पर्यावरणीय जबाबदारी यांच्यात सुसंवाद साधणारा दुवा म्हणूनच 'आर्यावन' ची संकल्पना साकारली गेली आहे. आर्या ओम्निटॉक आणि सिंटेल बाय अरविंद यांचे सीईओ परेश शेट्टी म्हणाले, "'आर्यावन' हे 'आर्या ओम्निटॉक' चे जणू हरित हृदय आहे.

# वीर बाल दिवस संपन्न

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

क्रांतिवीर लायन हार्टेड होनाजी भागुजी केंगले, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, घोडेगाव येथे वीर बाल दिवस कार्यक्रम संपन्न झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून कौशल्य रोजगार व उद्योजकता नाविन्यता विभागामार्फत महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून वीर बाल दिवस साजरा करण्यात आला.संस्थेचे प्राचार्य विजयकुमार नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. जारकरवाडी येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक अब्दुल इनामदार कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. सदर कार्यक्रमात याच शाळेतील इयत्ता सातवी मध्ये शिकणाऱ्या तृप्ती जयराम लबडे व धनश्री संदीप भोसले या खो-खो क्रीडा प्रकारातील राज्यस्तरीय खेळाडूंना प्रशस्तीपत्रके देऊन गौरविण्यात आले.

# पारगाव तर्फे खेड येथे आदिवासी ठाकर समाजातील युवकांना ५३ जातीचे दाखले वितरित

**मंचर : (समर्थ गांवकरी)**



पारगाव तर्फे खेड (ता. आंबेगाव) येथील आदिवासी ठाकर समाजातील युवकांना शासकीय कामकाजासाठी सातत्याने अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः जातीचा दाखला उपलब्ध नसल्यामुळे शिक्षण, नोकरी, शासकीय योजना व इतर लाभांपासून अनेक युवक वंचित राहत होते. या अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयाची दखल घेत प्रशासनाने पुढाकार घेत आदिवासी ठाकर समाजातील युवकांना ५३ जातीचे दाखले वितरित करण्यात आले. उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार डॉ. सचिन वाघ यांच्या नियोजनात हा विशेष उपक्रम राबविण्यात आला.

मंडळ अधिकारी मंचरच्या आरती खरे, ग्राम महसूल अधिकारी अनुप कवाने (पेठ) यांच्या वतीने पारगाव तर्फे खेड येथे आदिवासी ठाकर समाजातील एकूण ५३ युवकांना जातीचे दाखले वाटप करण्यात आले.

या उपक्रमासाठी ग्रामरोजगार सहाय्यक संघटना, आंबेगावचे अध्यक्ष सचिन पवार यांनी महत्त्वाची समन्वयाची भूमिका बजावली.तसेच पेठ येथील 'आपले सरकार' सेवा केंद्राच्या चालक राणी आल्हाट यांनी संपूर्ण कामकाज सुरळीतपणे पार पाडले.

जातीचे दाखले मिळाल्यामुळे आदिवासी ठाकर समाजातील युवकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, आता त्यांना शासकीय योजना, शैक्षणिक सवलती व रोजगाराच्या संधींचा लाभ घेणे सुलभ होणार आहे. प्रशासनाच्या या उपक्रमाचे ग्रामस्थांनी स्वागत केले आहे.

# डॉ. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख जयंती साजरी



**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षात आज दि.२७ डिसेंबर २०२५ रोजी डॉ. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांनी डॉ. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमास विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी डॉ. पराग भालचंद्र, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड, आयक्यूएसीचे संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी, उपकुलसचिव डॉ. रवी सरोदे, मेघशाम साळुंके, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, सहायक कुलसचिव रामदास पेद्दे‌वाड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांनी डॉ. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# स्वारातीम विद्यापीठात डॉ. महेश कस्तुरे यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील संशोधन व उद्योग क्षेत्र यांच्यात दृढ सहकार्यासंबंध (सिनर्जी) प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाचे माजी विद्यार्थी व भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडचे मुख्य व्यवस्थापक (संशोधन व विकास) डॉ. महेश कस्तुरे यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन आज दि.२७ डिसेंबर, २०२५ रोजी आयोजित करण्यात आले.

हा कार्यक्रम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. पी. ए. खडके, डॉ. सी. आर. बाविस्कर तसेच वित्त व लेखा अधिकारी डॉ. पराग भालचंद्र, संगणकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ.निलेश देशमुख, डॉ. शशिकांत ढवळे यांच्या सान्निध्यात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी या उपक्रमाचे स्वागत करत, विद्यापीठातील संशोधन क्षमतेला उद्योग क्षेत्राशी जोडण्यासाठी डॉ. कस्तुरे यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली. उद्योग व शैक्षणिक संस्थांमधील सहकार्य वाढल्यास संशोधन अधिक परिणामकारक व समाजोपयोगी ठरेल, असे त्यांनी नमूद केले.

उद्बोधनात डॉ. महेश कस्तुरे यांनी विद्यापीठातील नाविन्यपूर्ण संशोधन उद्योगांच्या गरजांशी संलग्न करून प्रत्यक्ष जीवनात उपयोजन करण्याचा भविष्यदर्शी दृष्टिकोन मांडला. सध्या सुरू असलेल्या संयुक्त उपक्रमांचा आढावा घेताना, उद्योग क्षेत्रातील सुरक्षितता वाढविणारी ऑप्टिकल फायबर आधारित अमोनिया शोध प्रणाली तसेच प्रायोगिक टप्प्यातील शैवाल-आधारित

जलशुद्धीकरण तंत्रज्ञान या प्रकल्पांची माहिती त्यांनी दिली.

स्टार्टअप निर्मिती व संशोधनासाठी निधी उपलब्धतेवर भर देत, डॉ. कस्तुरे यांनी बीपीसीएल 'अंकुर स्टार्टअप निधी' अंतर्गत हरित तंत्रज्ञान व सायबर सुरक्षा क्षेत्रातील योजनांची माहिती दिली. अमोनिया शोध प्रणालीवर आधारित स्टार्टअप प्रस्ताव सादर करून संशोधकांनी या निधीसाठी अर्ज करावा, असे आवाहन त्यांनी केले.

राष्ट्रीय प्राधान्यक्रमांचा उल्लेख करताना त्यांनी हरित हायड्रोजन क्षेत्रातील आव्हाने व त्यामधील व्यापक संशोधन संधी अधोरेखित केल्या.

तसेच प्लास्टिक कचऱ्याचे रस्ते बांधकामासाठी उपयुक्त साहित्यामध्ये रूपांतर करणाऱ्या यशस्वी सहकार्याचे

उदाहरण देत, उद्योग–शैक्षणिक भागीदारीमुळे होणाऱ्या ठोस परिणामांवर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी डॉ. कस्तुरे यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील संशोधन प्रकल्प प्रस्तावांच्या मूल्यमापनासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. अशा सुसंवादी भागीदारीमुळे विभागीय क्रमवारीत सुधारणा, बीपीसीएलसारख्या नामांकित कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिपच्या संधी आणि शैक्षणिक संशोधनाचा समाजहितासाठी प्रत्यक्ष लाभ सुनिश्चित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाचे संयोजन सीआयसीएमआरआयचे संचालक डॉ. कृष्ण चैतन्य, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर तसेच आयक्यूएसीचे संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी यांनी केले.